अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - १२ / २००८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०६ -०५ -२००८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक १२ , दिनांक १२ -०५-२००८.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती..............................................................

सदस्य / सदस्या, प्रभाग क्रमांक
अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा सोमवार दिनांक १२-०५-२००८ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

सोबत : १. दि.३-११-०७ च्या
मा.खास सभेचे इतिवृत्त
२. विषयपत्रिका.
३. प्रस्तावाची टिप्पणी.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सभा क्रमांक १२ दिनांक १२ - ०५- २००८ रोजी दु.१.०० वां होणा-या मा.खास सभेची विषय पत्रिका.

-- *--

| विषय क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | दिनांक ३-११-२००७ रोजी झालेल्या मा.खास सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव. |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेस प्राप्त विशेष निधी अंतर्गत रस्त्याचे प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर. |
| ४ | घरोघरी कचरा संकलन करणेसाठी घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी नव्याने उपलब्ध होणा-या कचरा वाहनांसाठी वाहन चालकांच्या नेमणुकी बाबत ऑफिस रिपोर्ट.(कंत्राटी पध्दतीने ) |
| ५ | १. कोठी ते यश पॅलेस रस्ता लांबी २.०० कि.मी. २. नेप्ती चौक ते पत्रकार चौक रस्ता लांबी १.९५५ कि.मी.रस्त्यांच्या सुधारणा करण्याच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देवून निविदा प्रसिध्द करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर. |
| ६ | केडगांव पाणी पुरवठा योजना मा.केंद्र शासनाच्या UIDSSMT योजने अंतर्गत मंजुर झालेली केडगांव पाणी पुरवठा योजना प्रोजेक्ट मॅनेजमेंन्ट कन्सलटंट म्हणुन म.जि.प्रा.कडून राबविणेसाठी करावयाच्या करारनामा व इतर तदनुषंगिक बाबी मान्यतेस्तव सादर. |
| ७ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : ०६-०५-२००८.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक :१२-०५-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : दिनांक ३-११-२००७ रोजी झालेल्या मा.खास सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : मागील दि.३-११-२००७, रोजी झालेल्या मा.खास सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविले.

**चर्चा :**

मा.श्री.दिप चव्हाण - जलतरण तलावाचे बाबतीमध्ये तांत्रिक सल्लागाराचा अहवाल आला आहे काय तसेच पठाण कुटुंबियांना रु.१,००,०००/- लाख देण्यांत आले किंवा पैसे देण्यांत आले आहे काय.

याबाबत श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर यांनी खुलासा केला की, समिती नेमली आहे त्यांच्या तीन बैठका झालेल्या आहेत. तांत्रिक सल्लागारांशी चर्चा चालु आहे. अहवालाचे काम चालू आहे. अहवाल पुढे चालु ठेवण्यांत येईल.

मा.उपमहापौर - फिल्ट्रेशन चे काम चालू आहे. प्लॅट चालू करणे बाबत सुचविले.

मा.श्री.दिप चव्हाण - जलतरण तलावाची परिस्थिती पुर्ण वाईट झालेली आहे. स्वच्छता करणे बाबत काहीही कार्यवाही झालेली नाही. काही नागरिकांना पोहल्या नंतर वांत्या झाल्या. याबाबत मी कल्पना दिलेली आहे. प्लॅट दुरुस्त करणे बाबत माणुस नाही

त्यावर श्री.निकम यांनी टेंडरचे काम चालू असले बाबत सांगितले.

मा.उपमहापौर - सदर जलतरण तलावाचे शौचालयास औटलेट नाही. पाणी बाहेर जात नाही पहाणी करुन कारवाई करण्याचे शहर अभियंता यांना सुचविले.

मा.श्री.कृ.द.जाधव - जलविहार बाबत चर्चा चालू करणे. दरवाढ कशीकाय केली आहे. कर व दर दि.२० फेब्रुवारी पर्यंत निश्चित केले जातात हे दर आगोदर का लागु केले नाहीत. ? जलविहार मधील संडास बाथरुमच्या औटलेटला नैसर्गिक उतार दिल्यास अडचण येणार नाही. तसेच उद्यानाचे कंम्पौंडचे काम अद्याप झालेले नाही ते करुन घेण्यांत यावे.

मा.श्री.उडाणशिवे - मागील प्रस्ताव क्रमांक २ मध्ये कर्मचा-यांच्या आरोग्य विषयक सुविधांसाठी प्रतिपुर्ती योजनेमध्ये आनंदऋषी हॉस्पीटलचा समावेश करावा.

मा.श्री.आगरकर - मागील सभेच्या वेळी मी चर्चा उपस्थित केली होती. सिध्दार्थनगर येथील हायमास्ट बाबत सामजस्याची भुमिका घेवुन एक हायमास्ट केंव्हा काढला जाणार आहे. तो काढुन योग्य ठिकाणी जेथे आवश्यकता असेल तेथे लावण्यांत यावा. महापौर म्हणुन आपण शहराचे पालक आहात. सिध्दार्थ नगर येथे आधी लावलेला व मंजूर केलेला हायमास्ट ठेवुन नंतर लावलेला काढावा.

मा.महापौर - यांनी यावर अहवाल द्यावा व त्याबाबत कार्यवाही करावी असे सुचविले.

मा.श्री.दिप चव्हाण - मागील सभेच्या विषय क्रमांक ४ मध्ये वाढीव विकास योजनेमध्ये कीती अर्ज आले याचा खुलासा करावा.

मा.महापौर यांनी माहिती घेण्यांत येईल असे सांगितले.

मा.श्री.आगरकर - मागी सभा विषय क्रमांक ५ बाबत हायमास्ट केंव्हा काढणार ते सांगावे. यापुर्वी ४२ वाडया वस्त्या अंधारात आहेत असे मी सुचविले होते.

मा.श्री.दिप चव्हाण - यांनी सांगितले की, याबाबत पहिल्या हायमास्ट चे बिल दिलेले आहे व वर्क ऑर्डरही दिलेली आहे.

मा.महापौर - यांनी हायमास्ट बाबत यादी तयार करावी नंतर त्यावर कार्यवाही करण्यांत येईल असे सांगितले. जे हायमास्ट मंजूर आहेत ते चालू करावेत व त्याचा अहवाल महानगरपालिका सभेपुढे देण्यांत यावा.

मा.श्री.गिरवले कैलास - हायमास्ट वर नांव लावण्यांत आलेली आहेत. ती नांवे काढुन घेण्याबाबत मागील ठराव मंजूर करणेंत आलेला आहे. परंतु ती नांवे कां काढली गेली नाही याचा खुलासा करावा.

मा.उपमहापौर - दोन महिन्या नंतर आचारसंहिता लागणार आहेच त्यानंतरही नांवे काढुन टाकावी लागणार आहेत तेंव्हा माळीवाडया पासुन याला सुरुवात करु.

मा.सौ.कविता दहिफळे - अप्पुहत्ती चौक व त्याचा परिसर ही कचराकुंडी झालेली आहे त्याबाबत काय कार्यवाही करण्यांत आली याचा खुलासा करावा.

मा.महापौर - पुतळयाच्या आसपास अतिक्रमण असल्यास कारवाई करण्यांत येईल असे सुचविले.

--*--

ठराव : सभागृहा मध्ये झालेल्या साधक - बाधक चर्चा व मा.सदस्य यांनी सभागृहामध्ये मांडलेल्या मतांचा विचार करता खालील बाबींचा समावेश करून त्या सह इतिवृत्त कायम करण्यांस मान्यता देण्यात येत आहे.

१. सिध्दार्थनगर येथील चौकात दोन हायमास्ट समोरासमोर उभारण्यात आले आहेत. त्यापैकी एक हायमास्ट देवी मंदिरा शेजारी बसविला आहे तो काढुन ख्रिश्चन दफन भुमी समोर बसविण्यांत यावा.

तसेच दोनही हायमास्टवर असलेले माहिती फलक त्वरीत काढुन घेण्यांत यावे. याबाबतचे सर्वस्वी अधिकार मा.महापौर यांना देण्यांत येत आहे.

अशा मजकुराच्या समावेशासह इतिवृत्त कायम करण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.किशोर डागवाले.

अनुमोदक : मा.श्री.कैलास गिरवले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक :१२-०५-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : दुखवटयाचे प्रस्ताव.

--*--

प्रस्तावाचा मजकुर :

**विषय क्रमांक २ - दुखवटयाचे प्रस्ताव :-**

मा.श्री.कृ.द.जाधव - माझे मित्र बांधकाम समितीचे सभापती व माजी नगराध्यक्ष श्री.सुरेशराव शेळके यांचे दु:खद निधन झाले आहे. ते नगराध्यक्ष असतांना शक्ती, भक्ती आणि युक्तीने काम करीत असत असे त्यांच्यामध्ये गुण होते. त्यांचा स्वभाव प्रेमळ होता. त्यांच्या दु:खद निधनाच्या दिवशी ब-याच कर्मचारी यांना अंत्यविधीस उपस्थित रहाता आले नाही. तेंव्हा विद्यमान नगरसेवकांचे निधन झाल्यास महानगरपालिकेला सुट्टी देण्यास हरकत नाही. याबाबत जरुर ती कार्यवाही करावी व आजची सभा तहकुब करावी असे सांगितले.

मा.श्री.भगवान फुलसौंदर - महानगरपालिकेचे पहिले सभागृह नेते नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष स्व.सुरेशराव शेळके यांचे स्मरणार्थ नेप्तीगेट चौकास संभाजी महाराज चौक नामकरण करावे व त्यांच्याच प्रयत्नातुन साकार झालेल्या नालेगांवातील शिवपवन मंगलकार्यालयास " सुरेश राव शेळके शिवपवन मंगलकार्यालय " असे नांव देण्यास हरकत नाही.

मा.श्री.अभय आगरकर - कै.सुरेशराव शेळके हे एक अभ्यासु आणि मुत्सददी नगरसेवक होते. प्रशासन यांच्यामध्ये सामंजस्याची भुमिका ठेवुन काम करीत असत त्यामुळे अनेक चांगले निर्णय घेणारा आमचा खरा सहकारी गमावला आहे. त्यांनी अनेक चांगल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे. शहर पालिकेमध्ये अनेक उत्पन्नाची साधने शहर विकासाचे प्रस्ताव त्यांनी सादर केले. नालेगावातील शिवपवन मंगलकार्यालय हे सर्वसामान्यां साठी मंगलकार्यालय उभारुन सामान्य जनांना दिलासा दिलेला आहे. ही त्यांच्या कामाची पावतीच आहे. ते अभ्यासू भुमिका सातत्याने मांडत असत परंतु या जगामध्ये प्रत्येकजण आला तो जाणार आहेच परंतु त्यांचे अकाली जाणे हे मनाला चुटपुट लावणारे होते. शहराच्या इतरही विकास योजनेमध्ये त्यांचे नांवे देवुन त्यांची स्मृती जतन करावी.

मा.श्री.दिप चव्हाण - माजी नगराध्यक्ष व महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक श्री.सुरेशराव शेळके, यांचे दु:खद निधन झाले. विद्यमान नगरसेवकाचे निधन झाल्यानंतर महानगरपालिकेमध्ये असा पहिलाच प्रसंग आलेला आहे त्यामुळे महानगरपालिका कार्यालय अशा प्रसंगी अतयावश्यक कामकाजाशिवाय बंद ठेवण्याचा निर्णय घ्यावा व सुट्टीची प्रोव्हीजन करावी त्यास मी पाठींबा देत आहे.

मा.श्री.अंबादास गारुडकर - माझे सहकारी नगरसेवक माजी नगराध्यक्ष कै.सुरेश शेळके यांच्या दु:खद निधनामुळे शहराची हानी झालेली आहे. त्यांच्या अंत्यविधी करीता अर्धा दिवस तरी कार्यालय बंद ठेवणे आवश्यक होते.

मा.श्री.त्रिपाठी - कै.सुरेशराव शेळके यांच्या दु:खद निधनाचा दिवस नाथ षष्टीचा होता. कै.सुरेशराव शेळके हे अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचे नगरसेवक होते. त्यांनी अनेक पदे भुषविली. सिना नदी अतिक्रमण, संभाजी महाराज पुतळा उभारणे ही त्यांच्या जीवनातील संभाव्य कामे होती ती कामे करुनच त्यांना श्रंध्दांजली अर्पण करावी व कार्यालयास सुट्टी न देता जास्तीत जास्त काम करावे.

मा.श्री.शंकरराव घुले - माझे जवळचे सहकारी कै.सुरेशराव शेळके यांचा आणि माझा जवळचा संबंध होता ते खुप चांगले कुस्तीगिर होते व शहराचे नगराध्यक्ष पदही त्यांनी भुषविले. कुस्तीचे धडे त्यांनी कोल्हापुर येथे घेतले. ते अभ्यासू नगरसेवक होते. त्रिपाठी यांच्या मताशी मी सहमत आहे. कै.शेळके यांच्या कुटुंबियांच्या दु:खात मी सहभागी आहे.

मा.श्री.आसाराम कावरे - स्व.सुरेशराव शेळके माजी नगराध्यक्ष यांच्या आजाराचे निदान खरोखरच झाले नाही ते चांगले पहिलवान होते. व अभ्यासू नगरसेवक होते. शिवपवन मंगलकार्यालयास त्यांचे नांव देण्यांत यावे मी त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

मा.श्री.अनंत जोशी - आतापर्यंत अनेक वक्त्यांनी जे मत व्यक्त केले त्या मताशी मी सहमत आहे. त्यांना श्रंध्दांजली म्हणुन त्यांच्या मनातील धर्मवीर संभाजी महाराज पुतळा लवकर बसवावा. मी वैयक्तीक व भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.महापौर - कै.सुरेशराव शेळके माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक यांच्यामध्ये विविध भुमिका साकार करतांना सामजस्याची भुमिका घेण्याची ताकत होती तसेच नविन नविन संकल्पना राबवुन काम करवुन घेण्याची ताकद होती. सन १९९२ पासुन छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्याचे प्रयत्न तयांनी केले लवकरच तो पुतळाही उभारला जाणार आहे. त्या रुपाने त्यांचे हे एक स्मारक होणार आहे. शहर वासियांच्या वतीने व सभागृहाचे वतीने मी त्यांच्या कुटुंबियांचे दु:खात सहभागी आहे. त्यांच्या स्मरणार्थ शिवपवन मंगलकार्यालयांस त्यांचे नांव देण्यांत मान्यता देण्यांत यावी. व त्यांचे दु:खद निधना निमित्त आजची सभा पाच मिनीटे तहकुब करण्यांत येत आहे.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दिनांक :१२-०५-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिकेस प्राप्त विशेष निधी अंतर्गत रस्त्याचे प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते कि, संदर्भिय शासन निर्णया अन्वये महानगरपालिकेस रस्ते सुधारणेसाठी विशेष निधी म्हणून रुपये ३.५० कोटीचे अनुदान प्राप्त झाले आहे. या शासन निर्णयातील मुद्या क्र.३ अन्वये महानगरपालिकेस रुपये ३.५० कोटीची तरतूद करावी लागणार आहे. सदर निधी उभारणे कामी सन २००८-०९ चे अर्थ संकल्पातील मुळ तरतूदीमध्ये खालील प्रमाणे बदल करावा असे वाटते.

| अ.नं. | लेखाशिर्ष | मुळ ०८-०९ तरतूद (लक्ष) | सुधारीत तरतूद (लक्ष) | घट (लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | रस्ते दुरुस्ती (पॅचींग) | १००.०० | ५०.०० | ५०.०० |
| २ | रस्ते कॉंक्रीटीकरण | ९०.०० | ५०.०० | ४०.०० |
| ३ | रस्ते डांबरीकरण/नुतनीकरण | २३०.०० | २१०.०० | २०.०० |
| ४ | रस्ते मजबुतीकरण | १३०.०० | ९०.०० | ४०.०० |
| ५ | गटर्स दुरुस्ती | १००.०० | ८०.०० | २०.०० |
| ६ | ड्रेनेज दुरुस्ती | १००.०० | ८०.०० | २०.०० |
| ७ | इमारत दुरुस्ती | ४५.०० | ३०.०० | १५.०० |
| ८ | शहरात नविन पाईप लाईन टाकणे | ५०.०० | ३०.०० | २०.०० |
| ९ | पाण्याची टाकी बांधणे | ५०.०० | २५.०० | २५.०० |
| | एकुण : | ८९५.०० | ६४५.०० | २५०.०० |

वरील प्रमाणे निधी उपलब्ध होईल असे वाटते. या प्रस्तावामध्ये समावेश करावयाच्या कामांची प्रारूप यादी सोबत सादर करण्यात येत आहे. शासन निर्णयातील मुद्या क्र. ३ अन्वये सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, मा. पालकमंत्री यांचे मार्फत शासनास सादर करावा लागेल. शासनाची मंजूरी प्राप्त झालेनंतर निविदा प्रक्रिया हाती घेण्यात येईल. कामांची यादी अवलोकनार्थ व मा. महासभेच्या मंजूरीस्तव तथा निर्णयास्तव सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मा.महासभेच्या मंजुरीस्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, १. सन ०८-०९ च्या अंदाजपत्रकात मुलभूत सुविधा विकास योजना मनपा हिस्सा अंतर्गत रू.१.०० कोटींची तरतुद केली आहे.

२. वरील तक्त्यात नमुद केलेल्या लेखाशिर्षाखालील रू. २.५० कोटी तरतुद कमी करून मुलभूत सुविधा विकास योजनेंतर्गत एकुण मनपा हिस्सा ३.५० कोटी टाकता येईल.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण २ (१) (र) ( पान क्र. ४११ ) अन्वये कार्यवाही करणे योग्य.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित नुसार मुळ अर्थ संकल्पातील उपरोक्त नमुद शिर्षकामध्ये दर्शविल्यानुसार फेर बदल (बहुमताने) करता येईल. करीता प्रस्तावात

दर्शविल्यानुसार रस्ता विकास कामे करणेसाठी तरतुद करणे क्रमप्राप्त असल्याने मंजुरीसाठी मा.महासभेकडे पाठविणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित मान्य.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट , शहर अभियंता, मुख्यलेखाधिकारी, मा.उपायुक्त (सा),मा.आयुक्त साहेब, व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

विषय क्रमांक : ३ - ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

- **मा.श्री. सुनिल त्रिपाठी** - सदर विषय मा.महापौर यांनी सभागृहापुढे आणल्या बद्दल प्रथम मी त्यांचे अभिनंदन करतो. यामधुन एकंदर सात कोटीच्या शहर विकासासाठी रस्ते होणार आहेत. तथापि हा एकंदर निधी घेण्यासाठी गटर दुरुस्ती हेडवरील २० लाख, ड्रेनेज दुरुस्ती हेडवरील २० लाख तसेच रस्ते मजबुतीकरण व शहरात नविन पाईप लाईन टाकणे २० लाख असे एकुण ६० लाख हा निधी पुर्वीच्या अंदाजपत्रकामधुन कमी केला जाणार आहे. मात्र या हेडवरील आवश्यकता पाहता या हेडवरील जास्त तरतुद करावयास पाहिजे होते.

सारसनगर बाबत पुर्णपणे विचार केलेला नाही त्याचा विचार केला पाहिजे. यामध्ये महानगरपालिकेने ज्या-त्या प्रभागामध्ये विकास कामे करणे ही प्रकृती आहे. मात्र तो विकास निधी इतरत्र वळविला गेल्यास ती विकृती होईल. परंतु मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला तर त्यासच संस्कृती म्हणता येईल तेंव्हा असा विचार करुन अत्यावश्यक रस्ते घेण्यांत यावेत. त्यामध्ये कब्रस्थान ते सोलापूर रोड शांतीनगर रस्ते करतांना ड्रेनेज नाही. याचा विचार केला जात नाही. सारसनगर ते मानधना यमुनानगर येथे कॉक्रीट कामे होत आहेत पण तत्पुर्वी त्याठिकाणी पाण्याची लाईन नाही. ड्रेनेज लाईन नाही ती तत्पुर्वी करणे आवश्यक आहे. यास जबाबदार कोण आहे. रस्ते करण्यापुर्वी पाणी आणि ड्रेनेज लाईन करणे हे अत्यावश्यक आहे.

यावर आयुक्त यांनी खुलासा केला की, शहर अभियंता यांना अंदाजपत्रके तयार करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत.

यावर मा.महापौर यांनी सदर ठिकाणचे पाईप लाईनचे प्रस्ताव मार्गी लावणे बाबत शहर अभियंता यांना सूचना केल्या.

**मा.श्री. सुनिल त्रिपाठी** - शांतीनगर ते नामगंगा गटर करणे आवश्यक आहे.

यावर शहरअभियंता यांनी खुलासा केला की, प्रस्ताव तयार केलेला होता तथापि मार्गी लागलेला नाही.

**मा.श्री.सुनिल त्रिपाठी** - त्यामुळे महानगरपालिकेचे जे नुकसान होणार आहे. त्यास जबाबदार कोण आहे.

**मा.श्री.आसाराम कावरे** - यापुर्वी अहमदनगर शहरातील प्रमुख चार रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडुन करुन घेण्याविषयी सुचविलेले होते तथापि सदरचे रस्ते अद्यापी झालेले नाहीत. मी माझ्या बहुजन समाज पक्षाच्या वतीने  मी यासाठी उपोषण करणार आहे यास तुम्ही जबाबदार रहाल असे सुचविले.

**मा.श्री.भगवान फुलसौंदर** - महानगरपालिकेला शासनाकडुन रस्त्यांसाठी साडे तीन कोटी रुपयांचे अनुदान मिळाले आहे ही एक चांगली बाब आहे रस्ते चांगले झाले पाहिजेत शहरामधील ६५ नगरसेवकांच्या रस्त्यांबाबत तक्रारी आहेत. रस्त्याच्या कामासाठी यापुर्वी पैसे नाहीत म्हणुन कामे होवु शकली नाहीत. आता मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध झालेला आहे. यामध्ये ख-या अर्थाने अहमदनगर शहराचा विकास होण्यासाठी प्रमुख मोठया महामार्गाचे रस्ते घ्यावेत व एम.एस.आर.डी.सी कडुन रस्ते

करावेत. नगरकरांना अपेक्षित असलेले रस्ते घ्यावेत. सावेडी कडे जाणारा बालिकाश्रम ते सावेडी रस्ता प्राधान्याने घेण्यांत यावा. या करीता अधिकारी आणि मा.नगरसेवकांनी साथ दिली पाहिजे. रस्त्यांमुळे नागरिकांना फायदा होवु शकेल रस्ते रुंद होतील व त्याचबरोबर गटारी व ड्रेनेज लाईन याही होणे जरुरीचे आहे. आपण वेळोवेळी ठराव करतो परंतु ठरावाची अंमलबजावणी होत नाही.

डी.पी.आर मधील सिनानदीच्या बाजुने जाणारा रस्ता तयार केला तर नगरकर धन्यवाद देतील. सिनानदी रस्त्याचे काम पूर्ण केले तर त्या बाबत आपण धन्यवादास पात्र राहाल. त्याबाबत सर्व गांभीर्याने विचार करावा असे सुचविले. शहर विकास व्हावा ही सर्वांचिच इच्छा आहे. त्यामुळे सर्व शहराचा फायदा होईल असे रस्ते घेण्यांत यावेत. अंतरराष्ट्रीय ठेकेदार बोलवावेत.

**मा.श्री.कैलास गिरवले** - शहराचा विकास व्हावा अशी तुम्हा आम्हा सर्वांचीच इच्छा आहे. परंतु काही रस्त्याच्या विकास कामांमध्ये काही लोकप्रतिनिधी हस्तक्षेप करतात उदा - बागरोजा म्यु.पल कॉलनी येथील प्रस्तावित गटर व रस्ता ते बरोबर नाही. शहर विकास व्हावा यामध्ये व्यक्तीव्देश नाही. शहर विकास होण्यासाठी अतिक्रमणाकडे दोन अधिकारी नेमण्यांत यावेत. गावठाण व गावठाण बाहेर असे दोन भाग करावेत.

यावर मा.आयुक्त सो, यांनी सांगितले की, शहर विकास करण्यासाठी नागरिकांच्या सहभागा शिवाय नगर विकास होवु शकणार नाही. सर्व पक्षीय १०० टक्के सहकार्य असल्याशिवाय शहराचा चेहरा मोहरा बदलता येणार नाही.

मा.श्री.अनंत जोशी - श्री.सतिष मैड - श्री.अशोक कानडे, -श्री.आसाराम कावरे, - श्री.कैलास गिरवले हे सर्व एकत्रित बोलण्यास उभे राहिले.

**मा.श्री.सतिष मैड** - रस्ते करतांना प्रथम नाल्या व ड्रेनेज लाईन करुनच रस्ते करावेत. अतिक्रमणा बाबत विषय उपस्थित झाला असता

**मा.श्री.कैलास गिरवले** - यांनी गंजबाजार फ्रुट मार्केटच्या जागेबाबत प्रश्न उपस्थित केला सदरची जागा सन १९९० पासुन भाडयाने दिली आहे. सदर जागेचे बांधकाम पुर्ण केलेले नाही. फ्रुट मार्केट येथे अतिक्रमण आहे काय परंतु ते काढले जात नाही. तथापि यामध्ये काही अधिकारी ३,५००/- रु. महिना घेतात असे सांगितले.

**मा.श्री.सतिष मैड** - त्याचप्रमाणे सावेडी रोडवरील बिग बजार मार्केट येथील महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण आहे. त्याठिकाणी महानगरपालिकेची जागा असलेबाबत बोर्ड लावावा असे सांगितले.

**मा.श्री.कैलास गिरवले** - रस्त्यांच्या प्रस्तावामध्ये महात्मा फुले नगर, कपिलेश्वर नगर, मधुबन कॉलनी खडीकरण व रस्ता करणे बाबत तसेच सारसनगर येथील कामांचा समावेश करावा.

**मा.श्री.सतिष मैड** - श्री.सातपुते इंजिनिअर यांनी जे प्रकरण दिलेले आहे. त्यामध्ये अगोदर नाल्या करुन घेण्यांत याव्या.

**मा.सौ.सुनिता साहनी** - वॉर्ड क्रमांक ३ मधील झेड पी शाळा ते इकरा स्कुल इ. रस्त्यांचे प्रस्ताव या यादीत घेण्यांत यावेत. असे सुचविले.

**मा.श्री. दिप चव्हाण** - शासन परिपत्रक मुद्दा क्रमांक ३ चा अर्थ काय आहे.

यावर शासन निर्णय वाचुन दाखविणे बाबत सुचविले सदरचा निर्णय वाचुन दाखविण्यांत आला.

**मा.श्री.दिप चव्हाण** - यांनी बजेटला मंजूरी का घेण्यांत आली नाही याची काय अडचण आहे सदर बोर्डापुढे मागील इतिवृत्त का नाही घेतले.

**मा.श्री.शं.ह.घुले** - यांनी इतिवृत्त घेण्यांत येईल असे सुचविले.

**मा.श्री.सुळ दिपक, उपमहापौर** - महानगरपालिकेत निरनिराळया रस्त्यांचे निविदा दर (टेंडर) दाखल होतांना ठेकेदार वाढीव दर देतात तसेच त्यांना डांबराचेही दर वाढुन दिले जातात. त्याबाबत त्यांनी जादा कामाचे दर टाकु नयेत व हे वाढीव दर कशाप्रकारे देत आहात याबाबत शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

या प्रस्तावातील कामांचे टेंडर काढतांना प्राईस एक्सलेशन क्लॉज ठेवावा व त्याला इतर वाढ देता येणार नाही असे नमुद करावे

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, वेळेत कामे न झाल्यास त्यांना दंड करण्यांत यावा ठेकेदार यांनी काम वेळेत केले नाही तर. डांबराचे रेट मिळणार नाही. व दंडाची कार्यवाही करण्या बाबत यापुर्वी महासभेने आयुक्त यांना अधिकार दिलेले आहेत.

यावर मा.आयुक्त यांनी सुचविले की, यापुर्वी ठेकेदारांना जी कामे दिलेली आहेत ती कामे पुर्ण झालेली नाहीत याबाबत श्री.मगर सिव्हील इंजिनिअर व पालवे शहर अभियंता यांनी सात दिवसात कामे सुरु केलेली नाहीत त्यांची यादी सादर करावी व सदरच्या ठेकेदारांची नांवे काळया यादीत टाकावीत.

उपमहापौर सुळ यांनी सांगितले की, ५, १० व २० लाखांची कामे अशा प्रकारे कामांची कॅटॅगरी करावी.

**मा.श्री.अशोक कानडे** - शासनाने महानगरपालिकेला रस्ते विकासासाठी साडे तीन कोटीचा जो निधी उपलब्ध करुन दिलेला आहे व यासाठी मा.महापौर यांनी जे प्रयत्न केले याबद्दल त्यांचे खास अभिनंदन करतो व ते धन्यवादास पात्र आहेत. यामुळे नगर शहराचा चेहरा मोहरा बदलत आहे. रस्त्याचे रुप चांगले बदलत आहे. यामध्ये शासनाचे साडेतीन कोट व महानगरपालिकेचे साडेतीन कोटी उपलबध करुन एकंदर सात कोटींची विकास कामे होत असलयाने ख-या अर्थाने महापौर व सर्व सहकारी यांचे कौतुक करण्यासारखी गोष्ट आहे. विकास कामांमध्ये राजकारण आणणार नाही. तसेच मा.आयुक्त हांगे साहेब यांनी जी भुमिका आज सभागृहामध्ये घेतली आहे. ती चांगली आहे.

उपरोक्त प्रस्तावामध्ये यादी दुरुस्त करावी व त्याप्रमाणे अंदाजपत्रके करावी अशी विनंती केली व हे बदल करण्याचे अधिकार मा.महापौर यांना देण्यांत यावेत. तसेच गांधीनगर रस्त्याबाबत जी.आय.पाईपची भुमिका काय आहे.

**मा.श्री.शेख मुदस्सर** - मकुंदनगर येथील पाणी प्रश्नाबाबत विचार व्हावा.

**मा.श्री.अभय आगरकर** - निरनिराळया अंदाजपत्रकातील तरतुद कमी करीत असतांना विद्यमान चालू कामावर परिणाम होणार आहे काय तसेच शहरातील सर्व वॉर्डामधील विकास कामांना समान न्याय देणार आहात काय व समतोल विकास होण्यासाठी काय कार्यवाही करणार आहात या बाबतचा खुलासा करण्यांत यावा.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, सध्याच्या कुठल्याही विकास कामावर यामुळे अडथळा येणार नाही. रस्ते डांबरीकरण, गटार दुरुस्ती, नविन पाईप लाईन इत्यादी हेड फार मोठे कमी केलेले नाहीत. तसेच रस्ते दुरुस्ती पॅचिंग कामावरही यावर परिणाम होणार नाही. असे सांगितले.

**मा.श्री.अभय आगरकर** - उपरोक्त प्रस्तावावरील यादी पाहिलीतर या यादीमध्ये नविन ॲड करणार किंवा कमी केले जाणार काय व नेमकी कोणत्या यादीस मान्यता देण्यांत येणार आहे. व सर्वांना समान न्याय देणार आहात काय.

**मा.श्री.दिपक सुळ उपमहापौर** - जे आवश्यक आहेत ते त्यामध्ये घेण्यांत येतील.

**मा.श्री.अभय आगरकर** - समतोल विकास झाला पाहिजे.

**सभापती, स्थायी समिती मा.श्री.अविनाश घुले,** - सर्व विषय मंजूर करावेत व पुढील विषय घ्यावेत असे सुचविले.

-- *--

**ठराव -**

३ अ -

कार्यालयीन प्रस्ताव व सभागृहामध्ये झालेली साधक बाधक चर्चा नुसार ठरविण्यात येते की, महानगरपालिकेस प्राप्त विशेष निधी अंतर्गत व मनपा निधी अशा एकत्रित निधीमधून खालील प्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. मा.शासनाच्या विशेष निधीतील कालबध्द कार्यक्रम नियोजनबध्द रितीने लवकरात लवकर हाती घेता

यावा व नागरी सुविधेच्या दृष्टिने आवश्यक असणारे प्रकल्प त्वरेने हाती घेता यावेत यास्तव कार्यालीयन सोपास्कार पार पाडण्याकरिता विलंब लागू नये या दृष्टिने सभागृहामध्ये झालेल्या चर्चे नुसार प्रशासनाने प्रस्तावामध्ये सुचित केल्यानुसार अंदाजपत्रकातील लेखाशिर्षा मधील तरतुदीमध्ये पुढे दिलेल्या तक्त्यानुरूप बदल व दुरूस्ती करण्यास ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार मनपा निधीची रक्कम रू. ३कोटी ५० लक्ष रूपयाची तरतुद करण्यात यावी.

| अ.नं. | लेखाशिर्ष | मुळ ०८-०९ तरतूद (लक्ष) | सुधारीत तरतूद (लक्ष) | घट (लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | रस्ते दुरुस्ती (पॅचींग) | १००.०० | ५०.०० | ५०.०० |
| २ | रस्ते कॉक्रीटीकरण | ९०.०० | ५०.०० | ४०.०० |
| ३ | रस्ते डांबरीकरण/नुतनीकरण | २३०.०० | २१०.०० | २०.०० |
| ४ | रस्ते मजबुतीकरण | १३०.०० | ९०.०० | ४०.०० |
| ५ | गटर्स दुरुस्ती | १००.०० | ८०.०० | २०.०० |
| ६ | ड्रेनेज दुरुस्ती | १००.०० | ८०.०० | २०.०० |
| ७ | इमारत दुरुस्ती | ४५.०० | ३०.०० | १५.०० |
| ८ | शहरात नविन पाईप लाईन टाकणे | ५०.०० | ३०.०० | २०.०० |
| ९ | पाण्याची टाकी बांधणे | ५०.०० | २५.०० | २५.०० |
| | एकुण : | ८९५.०० | ६४५.०० | २५०.०० |

तसेच मा.शासनाचा विशेष अनुदान व मनपा निधी यामधून खालील प्रस्तावित कामांची यादी समाविष्ट करण्यास ही सभा मान्यता देण्यात येत आहे. सदरच्या कामाकरिता येणा-या खर्चास देखील मान्यता देण्यात येत असून तदनुषंगिक खर्च देखील मंजूर करण्यात येत आहे.

## विशेष अनुदान अंतर्गत प्रस्तावित कामांची यादी

| अ.नं. | प्र.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २ | पुष्पक हॉटेल ते वैष्ण्वी ट्रेडर्स ते तपोवन रोड पर्यंत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | ९,८३,६१६/- |
| २ | ९ | टिळक रोड (जुना, वाडियापार्क समोरिल) रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे. | २५,००,०००/- |
| ३ | २ | राज्य कर्मचारी वसाहत (समतानगर) रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ७,०८,०४२/- |
| ४ | १२ | गुलमोहर चौक ते कुष्ठधाम ते पाईपलाईन रोड वरील भिस्तबाग चौक रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २०,००,०००/- |
| ५ | १५ | भिंगारवाला चौक ते सर्जेपुरा रंगभुवन शॉपींग सेंटर पर्यंत ४० एम एम ॲस्फलटिक कॉक्रीट करणे. | २७,१६,५९६/- |
| ६ | ८ | केडगांव येथील भुषणनगर मधील अंतर्गत आरती हौ., अजिंक्य नगर, राहींज मळा, एकता कॉलनी, गणपती मंदीर परिसर, राणी लक्ष्मीबाई चौक व नम्रता कॉलनी | ३३,०३,९१४/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे | |
| ७ | २ | शिवनगर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | २४,००,०००/- |
| ८ | ५ | जिजामाता उद्यान ते ढोर वस्ती ते व्हिडिओकॉन रस्ता डांबरीकरण करणे. | १५,१५,०००/- |
| ९ | ५ | सारसनगर पूल ते कानडेमळा दरम्यान रस्त्याचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे. | ९,९५,२०५/- |
| १० | ९ | जैन स्थानक जवळ रेल्वे स्टेशन कंपौंड पासुन अनंत सोसायटी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १२,०१,००० /- |
| ११ | १५ | राज चेंबर ते मंगलगेट पोलिस चौकी ते गंज बाजार कोप-यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,००,७०० /- |
| १२ | ८ | केडगांव एकनाथनगर राधाकृष्ण कॉलनी येथे जगदाळे घर ते राधाकृष्ण मंदीर, डयुरा फॅब ते वाळके ते शेख ते नाल्यापर्यंत जलनिसारण व्यवस्थेसह अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १४,१७,६६३/- |
| १३ | ३ | साई फर्निचर ते बजाज कॉलनी , शेख हाजी गफार घर ते सुल्तान किराणा, शालिमार सप्लायर्स समोरील कॉलनी, शेख अन्वर घर तसेच महाराष्ट्र किराणा ते आयेशा मस्जिद, नशेमन कॉलनी, जिशान कॉलनी, तरन्नुम कॉलनी, सिमला रो.हौसिंग सोसायटी ते तांबोळी घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ३०,०१,३४० /- |
| १४ | १२ | नोबेल हॉस्पीटल अंतर्गत रस्ते मजबुतीकरण डांबरीकरण करणे | ५,९८,०६५/- |
| १५ | ११ | धर्माधिकारी मळा अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे | ९,९०,०००/- |
| १६ | १ | टिपरे घर ते विशाल हनुमान मंदीर ते दुतारे वस्ती रस्ता डांबरीकरण करणे. | ९,९१,२६३/- |
| १७ | १ | राघवेंद्र स्वामी रोड ते रमजान भाई शेख यांचे वर्कशॉप ते गोपीनाथ आढाव घर ते खरात घर ते भोडे घर ते बालाजी नगर रस्ता डांबरीकरण करणे | ९,९८,३००/- |
| १८ | ८ | केडगाव आयोध्यानगर येथील सोनटक्के घर ते कोतकर ते लांडे ते बडे ते ओम मेन्स पार्लर ते घुले सॉमिल व शेळके घर ते महाले घर पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे | ६,९७,३००/- |
| १९ | १ | नगर मनमाड रोड ते चव्हाण हॉस्पीटल ते गणपती मंदीर म्हस्के घर ते भांडे घर रस्ता डांबरीकरण करणे | ९,७२,३७१/- |
| २० | ३ | गौरवनगर भागात कांबळे घर ते डिडवाणी घर तसेच आवारे घर ते विजय लॉड्री पर्यंत तसेच आफाक घर ते आंतेपल्लू घरापर्यंत डांबरीकरण करणे. | ७,००,६३७/- |
| २१ | ३ | फकिरवाडा (औरंगाबाद रोड) पंचवटी हॉटेल ते एस.एस.खान घरापर्यंत डांबरीकरण करणे | ५,००,४२४/- |
| २२ | १ | नगर मनमाड हायवे ते अमित सर्व्हीस स्टेशन मागील भाग ते घुले हॉस्पीटल ते गुरुदत्त कॉलनी ते आकांशा | ९,१९,४७९/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ब्युटीपार्लर ते मंचे कॉलनी ते अक्षय कॉलनी ते बोरकर घर रस्ते डांबरीकरण करणे | |
| २३ | ८ | केडगांव लिंक रोड दिप नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ८,२५,६१७/- |
| २४ | ५ | पराग बिल्डींग ते चांदणी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | ५,००,२००/- |
| २५ | १६ | कासमशहा दर्गा ते शाळा क्र.४ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे तसेच पैमाना हॉटेल ते बकर कसाब जमातखाना रस्ता डांबरीकरण करणे | ७,०३,५०५/- |
| २६ | ११ | मनमाड रोड ते नाना नानी पार्क ते बालीकाश्रम रोड रस्ता डांबरीकरण करणे | ६,७२,०००/- |
| २७ | १ | पंचवटीनगर अंतर्गत भागात डांबरीकरण करणे | १२,००,१७९/- |
| २८ | ७ | केडगांव बालाजी कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे व बालाजी संपवेल येथील कॅक्रीटीकरण करणे. | ६,९२,०५९/- |
| २९ | १ | साईबन कॉलनी, आशियना कॉलनी, आयोध्या, अक्षता अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | १२,००,५८५/- |
| ३० | १७ | माळीवाडा वेस ते वाडियापार्क ते मुकुंद मंगल कार्यालय पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | १२,५६,३९७/- |
| ३१ | १ | स्मशानभूमी रोड ते बारस्कर कॉलनीरस्ता डांबरीकरण करणे | ६,३५,०००/- |
| ३२ | ७ व ८ | केडगांव मधील नगर-पुणे रोड , केडगांव हनुमानमंदिर ते देवी मंदिरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे व सी.डी.वर्क बांधणे. | ४४,१५,१६२/- |
| ३३ | ६ | आनंदधाम, छत्रपती भाजी मार्केट ह्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे. | २४,००,०००/- |
| ३४ | १ | १. अकोलकर ओपीडी ते शिवा चव्हाण घर ते पोखर्णा घरापर्यंत २. वडगांवगुप्ता रोड ते वक्ते कॉर्नर पर्यंत ४० एम.एम.डब्यु.बी एम व डांबरीकरण करणे | १२,००,७७६/- |
| ३५ | १ | डॉन बास्को रोड अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे. | ४,००,६२४/- |
| ३६ | ११ | मनमाड रोड ते शाहूनगर ते रिंग रोड रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे | ६,९९,९९९/- |
| ३७ | १ | आरोह कॉलनी, सब्बन कॉलनी व वाघमळा रस्ता डांबरीकरण करणे | ११,०४,१३४/- |
| ३८ | ७ | केडगांव ओंकार नगर येथे अंतर्गत रस्त्याचे जलनि:स्सारण व्यवस्थेसह डांबरीकरण करणे. | २८,२४,३५१/- |
| ३९ | २१ | माणिक चौक ते संगम चौक ते बुरुडगल्ली मारुती मंदीर, चांद सुलताना हाईस्कुल ते बॉम्बे बेकरी व माणिक चौक ते मदवशाह पिर व तुलसीविहार बाळासाहेब देशपांडे दवाखाना पर्यंत व वर्धमान चेंबर ते अर्बन बँक व नया घर ते बॉम्बे मिठाई वाला पर्यंत | ११,१८,०४५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | डांबरीकरण करणे. | |
| ४० | १ | नागापुर साईश्रध्दा कॉलनी, गुरुकृपा कॉलनी, ओंकार कॉलनी, अंकुर कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | ९,८०,६८५/- |
| ४१ | १ | संत तुकाराम नगर ते रेणुका सप्लायर्स ते पुंड इस्त्री दुकान ते सोनवणे घर रस्ता डांबरीकरण करणे | ९,५०,५६६/- |
| ४२ | ३ | अलमास पार्क ते जिल्हा परिषद शाळा ते इकरा स्कुल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | ७,२८,०००/- |
| ४३ | ७ | केडगांव येथील शिक्षक कॉलनी व मोतीनगर येथे जलनि:स्सारण व्यवस्थेसह रस्ता डांबरीकरण करणे. | १३,२७,५२३/- |
| ४४ | ३ | न्यु हिंद पार्क शहबाज किराणा स्टोअर ते अलहिंद किराणा स्टोअर ते इकबाल पत्रकार ते मरियम मस्जीद पर्यंत रस्ते डांबरीकरण करणे. | ६,४२,०००/- |
| ४५ | ४ | कृष्णा कॉम्पलेक्स आर टी ओ रोड ते माहेश्वरी कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | ५,१०,०००/- |
| ४६ | १ | भारत बेकरी ते सय्यद घर भिंगारदिवे घर ते संपत किराण दुकाण रस्ता डांबरीकरण करणे | ८,९८,३००/- |
| ४७ | २ | सुर्य नगर अंतर्गत रस्त्यांचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे | २०,००,४१०/- |
| ४८ | २ | श्रीराम चौक ते वसंत टेकडी पाण्याची टाकी ते संदेश नगर रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | ५,०७,३९८/- |
| ४९ | ८ | केडगांव रभाजी नगर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | २४,५०,१२४/- |
| ५० | ४ | कोठला धार्मिक परिसर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | ६,००,८००/- |
| ५१ | ३ | मरियम मस्जीद जवळील रस्ते डांबरीकरण करणे | ५,१७,०००/- |
| ५२ | १२ | डिझाईनर कॉलनी अे व बी अंतर्गत डांबरीकरण करणे | ५,७४,०००/- |
| ५३ | ७ | वार्ड क्र. मध्ये केडगाव सहयाद्री नगर व सुंशातनगर भागात रस्ता डांबरीकरण करणे | १२,११,०००/- |
| ५४ | ७ | केडगांव मधील अरणगांव रोड मयुरी नगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,६०,२१६/- |
| ५५ | ३ | इक्रास्कूल मेनरोड ते मरियम मस्जिद ते मुन्नी आप्पा घरापर्यंत असलेली तीन रस्ते डांबरीकरण करणे . | १०,००,६००/- |
| ५६ | ३ | ए.डी.सी.सी. बॅक ते संभाजी टी सेंटर पर्यंत रस्ते डांबरीकरण करणे | ५,५०,०००/- |
| ५७ | ५ | सारसनगर महात्मा फुले नगर अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे. | ७,३१,५३०/- |

३ ब - सभागृहामध्ये झालेले साधक बाधक चर्चे नुसार खालील कामे महानगरपालिकेच्या उपलब्ध निधीमधून प्राधान्य क्रमाने हाती घेण्यात यावी.

१) वारूळाचा मारूती येथे पुल बांधणे.

२) रेल्वे पुल ते मॉडर्न फौंड्री ते देवी मंदिर हा रस्ता मनपा फंडातून नवरात्री पूर्वी करण्यात यावा व त्यास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

३) गुलमोहर रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करणे.

४) नालबंद खुंट ते भिंगारवाला चौक ते अमृत किराणा स्टोअर पर्यत रस्ता डांबरीकरण करणे.

५) मा.सौ.संध्या बाळासाहेब पवार, नगरसेविका यांची यादी प्रभाग क्र. २ मधील निर्मल नगर भागामध्ये पानसंबळ घर ते तपोवन रोड व उर्वरित रस्त्याचे डांबरीकरण करणे.

६) भिडे हॉस्पीटल ते शुभम मंगल कार्यालय ते रासने नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे.

७) आगरकर मळा, स्वामी कॉलनी ,झेड.पी कॉलनीतील रस्ते रूंदीकरण मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

८) मा.सौ.मंगला राजकुमार कांबळे, नगरसेविका यांची यादी प्रभाग क्र. ८ मध्ये केडगांव येथील रभाजी नगर अंतर्गत भागामध्ये ड्रेनेज लाईन टाकून मिळणे बाबत.

९) प्रोफेसर कॉलनी जवळील साधना हौ.सो. अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे.

१०) मा.सौ. सविता दिलीप मोरे, नगरसेविका यांची यादी प्रभाग क्र. १ मधील सेलटॅक्स कॉलनी, सुदर्शन कॉलनी व नम्रता कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे.

११) शिक्षक कॉलनी ते मोती नगर ते चोभे रो हौसिंग ते नाला येथे बंद पाईपची गटर करणे.

सुचक - मा.श्री.विनीत पाउलबुधे

अनुमोदक - मा.श्री.सुनिल कोतकर

ठराव बहुमताने मंजूर

खर्च मंजूर. नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक :१२-०५-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : घरोघरी कचरा संकलन करणेसाठी घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी नव्याने उपलब्ध होणा-या कचरा वाहनांसाठी वाहन चालकांच्या नेमणुकी बाबत ऑफिस रिपोर्ट.(कंत्राटी पध्दतीने )

--*--

प्रस्तावाचा मजकुर : मा. आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडून मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार (डि.पी.आर.) १२ वा वित्त आयोग निधी मधून (घन कचरा व्यवस्थापनासाठी) घरोघरी जावून कचरा संकलन करणेकामी वाहन खरेदी करण्यासाठीच्या प्रस्तावाला मिळालेल्या मंजूरीनुसार अहमदनगर महानगरपालिका मोटार वाहन विभागामार्फत वाहन खरेदीच्या प्रक्रीया प्रचलित नियमानुसार करण्यात येत असून सदर वाहन लवकर उपलब्ध होणार आहे.

तथापि, नव्याने उपलब्ध होणा-या एकूण ३० वाहन (टाटा एस.आर. १५ व टाटा ७०९ १५) व दोन कंटेनर प्लेसर साठी वाहनचालकांची आवश्यकता भासणार आहे. कारण महानगरपालिका अस्थापनासुचीवरील वाहन चालकांची संख्या अपूरी पडत आहे असे दिसते कारण दिनांक १४-०२-२००८ रोजी या संदर्भात सविस्तर प्रस्ताव आरोग्य मार्फत प्रस्ताव सादर केलेला असता मा. उपायुक्त कर यांचे आदेशान्वये सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी मोटार व्हईकल विभागाकडे दिनांक २६/०२/२००८ रोजी पाठविण्यात आलेले आहे. व सदर विभागाकडून वाहन चालक उपलब्ध नाही. असे सांगण्यात आले. वाहन खरेदीच्या प्रस्तावाला मंजुरी देतांना मा.आयुक्त तथा संचालक , नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी , मुंबई यांचेकडील खालील अटी घालण्यात आलेली आहे.

अट क्रमांक :- (ड ) बाबत - सदर वाहनाकरीता नव्याने वाहन चालकाचे पद मंजुर करण्यात येणार नाही. सध्या अस्तित्वात असलेल्या महानगरपालिका आस्थापना सुचीवर वाहन चालकांची पदे मंजुर असुन नव्याने प्राप्त होणा-या वाहनांकरीता सदर वाहन चालक उपलब्ध होणार नाही व नव्याने वाहन चालकांचे पदांना शासनाकडून मंजुरी दिली जाणार नाही.असे नमुद केलेले असल्याने मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे आवश्यक वाटते.

तथापि, महाराष्ट्र शासन मान्य महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ (मेस्को) यांचे कडील उपलब्ध वाहन चालकांच्या नेमणूक करणे उचित वाटते. कारण शासनाचे मान्यता असल्याने टेंडर काढण्याची आवश्यकता नाही. मानधनाने ठरवण्याची आवश्यकता नाही. वाहन चालक अनुभवी असल्याने काय सुरळीतपणे होवू शकते त्यामुळे वाहनांचा वापर व देखभाल योग्य रितीने घेऊन म.न.पा. मार्फत नागरिकांना चांगल्या सेवा देता येवू शकते. या कारणास्तव पुणे येथील घोरपडीमध्ये असलेल्या मेस्को कार्यालयाशी दुरध्वनी क्रमांक २६३३०६६४ वरीष्ठ व्यवस्थापक प्रवर्तक व प्रशासनची वि.गो. जोशी यांच्याशी चर्चा करुन

सदर संस्थेच्या वाहन चालक पुरविणेसंदर्भात असलेल्या अटी व शर्ती इत्यादी निष्कारण खर्च मार्गदर्शनासाठी मागवून घेण्यात आली.

सदर माहिती पत्रकातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे -

१) मेस्कोमार्फत वाहन चालक पुरविण्याबाबत अटी व शर्ती खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत-

(अ) कंत्राटी पद्धतीने मासिक वेतनाप्रमाणे वाहन चालक पुरविले जातील. रोजंदारीवर वाहन चालक पुरविले जात नाहीत.

(ब) वाहन चालकासाठी कमीत कमी एक वर्षाच्या कालावधीसाठी कंत्राटाचा करार करावा लागेल.

(क) वाहन चालकांना दरवर्षी पगारी ५२ दिवस आठवडे ऑफ, २१ दिवस रजा व ०४ दिवस राष्ट्रीय सुट्या लागू आहेत. त्या दिवशी बदली वाहन चालक पुरविला जाणार नाही. तसेच तो आजारपणामुळे अथवा अन्य काही कारणास्तव गैरहजर झाल्यास त्याचा बदली दुसरा वाहन चालक पुरविला जाणार नाही.

(ख) वाहन चालकाची कामाची पाळी ०८ तासांची राहील.

(ग) वाहन चालकाने ०८ तासाच्यावर कार्य केल्यास त्याला Over Time च्या दरात मोबदला द्यावा लागले.

(घ) वाहन चालकाने परगावी जाऊन कार्य केल्यास व तेथे रात्री मुक्काम केल्यास त्याकरिता त्याला दररोज रु. १००/- च्या दराने दैनंदिन अतिरीक्त भत्ता द्यावा लागेल. हा भत्ता उपरोक्त (ग) मध्ये नमूद केलेल्या Over Time देणे आवश्यक आहे.

२. वाहन चालकासाठी मासिक दर पत्रक व मसुदा करारनामा या पत्रासोबत जोडलेला आहे.

<u>झोन १ मधील चालकाचा दरमहिन्याचा भत्ताचा तपशील खालीलप्रमाणे</u>

| नं. | तपशील | चालक |
|---|---|---|
| **अ)** | **पगार** | |
| १) | मूळ (कमीत कमी भत्ता) | ३७५०.०० |
| २) | व्हि.डी.ए.(महत्वाचा भत्ता) (नोट १ पहा) | ६४७.८० |
| | डी (एस.इ.आर. १ + २) | ४३९७.८० |
| ३) | एस.इ.आर. १ व २ घरभत्ता @ १० %. | ४३९.७८ |
| ४) | एस.इ.आर. १ व २ वॉशिंग @ १० % . | ४३९.७८ |
| ५) | **एकूण** | **५२७७.३६** |
| **ब)** | **स्टॅच्युटोरी कंप्लाईन्सेस** | |
| ६ | एस.इ.आर. १ व २ ई.पी.एफ. @ १२ %. | ५२७.७४ |
| ७ | एस.इ.आर.१ व २ ई.डी.एल.आय. (पी.एफ.) @ 1.11 %. | २१.९९ |
| ८ | एस.इ.आर. १ व २ ए.डी.एम. खर्च पी.एफ. @ 1.11 % . | ४८.८२ |
| ९ | इंशुरन्स डब्लू. सी. ए. खाली | ३०.८७ |
| १० | एस.इ.आर. १ व २ बोनस @ ८.३३ %. | २९१.६७ |
| ११ | एस.इ.आर. १ व २ ग्रॅच्युटी @ ४.८१ %. | २११.५३ |
| १२ | महाराष्ट्र लेबर वेलफेअर फंड | ६.०० |
| १३ | सर्व्हिस टॅक्स (नोट ५ पहा) | |
| १४ | **एकूण** | **११३८.६२** |

| | | |
|---|---|---|
| | **<u>वेगळे चार्जेस</u>** | |
| १५ | २१ दिवस इ.एल. व ०४ राष्ट्रीय सुट्या - २५ दिवसांचा पगार | ३६६.४८ |
| १६ | **एकूण** | ३६६.४८ |
| **डी** | **मेस्को अर्निंग** | |
| १७ | एस.इ.आर. ५, १४, व १६ सर्व्हिस चार्जेस @ 14 % | ९४९.४८ |
| **१८** | **एकूण** | **९४९.५४** |
| **१९** | **एकूण (एस.इ.आर. ५, १४, १६ व १८)** | **७७३२.०१** |
| **२०** | **रेट पर मंडेय** | **३२२.१७** |

झोन १ मधील चालकाचा दरमहिन्याचा भत्ताचा तपशील खालीलप्रमाणे

| **नं.** | **तपशील** | **चालक** |
|---|---|---|
| **अ)** | **पगार** | |
| १) | मूळ (कमीत कमी भत्ता) | ३७५०.०० |
| २) | व्हि.डी.ए.(महत्वाचा भत्ता) (नोट १ पहा) | ६४७.८० |
| | डी (एस.इ.आर. १ + २) | ४३९७.८० |
| ३) | एस.इ.आर. १ व २ घरभत्ता @ १० %. | ४३९.७८ |
| ४) | एस.इ.आर. १ व २ वॉशिंग @ १० % . | ४३९.७८ |
| ५) | **एकूण** | **५२७७.३६** |
| **ब)** | **स्टॅच्युटोरी कंप्लाईन्सेस** | |
| ६ | एस.इ.आर. १ व २ ई.पी.एफ. @ १२ %. | ५२७.७४ |
| ७ | एस.इ.आर.१ व २ ई.डी.एल.आय. (पी.एफ.) @ 1.11 %. | २१.९९ |
| ८ | एस.इ.आर. १ व २ ए.डी.एम. खर्च पी.एफ. @ 1.11 % . | ४८.८२ |
| ९ | इंशुरन्स डब्लू. सी. ए. खाली | ३०.८७ |
| १० | एस.इ.आर. १ व २ बोनस @ ८.३३ %. | २९१.६७ |
| ११ | एस.इ.आर. १ व २ ग्रॅच्युटी @ ४.८१ %. | २११.५३ |
| १२ | महाराष्ट्र लेबर वेलफेअर फंड | ६.०० |
| १३ | सर्व्हिस टॅक्स (नोट ५ पहा) | |
| १४ | **एकूण** | **११३८.६२** |
| | **<u>वेगळे चार्जेस</u>** | |
| १५ | ५२ दिवस आठवडी सुट्टीचा पगार (5+14/26*52/12) | १०६९.३३ |
| १६ | २१ दिवस पी.एल. (1+2/30*21/12*2) चा पगार | ५१३.०८ |
| १७ | ४ दिवस पी.एल. (Ser 1+2/30*4/12*2) दिवसांचा पगार | ९७.७३ |
| १८ | **एकूण** | १६८०.१४ |
| **डी** | **मेस्को अर्निंग** | |
| १९ | एस.इ.आर. ५, १४, व १६ सर्व्हिस चार्जेस @ 14 % | ११३३.४६ |
| **२०** | **एकूण** | **११३३.४६** |
| **२१** | **एकूण (एस.इ.आर. ५, १४, १८ व २०)** | **९२२९.५७** |
| **२२** | **रेट पर मंडेय** | **३०३.४४** |

३. उपरोक्त अटी व शर्ती

उपरोक्त अटी व शर्ती दरपत्रक व करारनामा आपणास मान्य असल्यास पुरवठा आदेश द्यावा हि विनती असे कळविले आहे.

सदर महामंडळाची सेवा कार्यक्षेत्र खालीलप्रमाणे आहे

१. सुरक्षा रक्षक पुरविणे.

२. बांधकाम व दुरुस्ती विभाग.

३. पेट्रोल पंप चालविणे.

४. वाहन चालक पुरविणे.

५. माजी सैनिक उत्पादन व प्रशिक्षण केंद्राव्दारे दर्जेदार सागवानी स्टील फर्निचर तयार करणे व शासनाने ठरविलेल्या दरात विक्री करणे.

६. माजी सैनिकांच्या अवलंबितासाठी सरकारमान्य शिवण व कर्तन शिक्षण देणे.

७. एकमेव अद्यवयात संगणकीकृत ऑफसेट प्रिंटींग प्रेस चालविणे.

८. टोल नाक्यावर पथकर वसुली.

सध्या सदर महामंडळाचे ग्राहक -

- भारत संचार निगम मर्या.- पुणे व कोल्हापूर
- महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ मर्या. - अकोला, सातारा, नाशिक, पोफळी अशी २५ ठिकाणे
- यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकॅडमी (यशदा)- पुणे
- महानगरपालिका- नांदेड व नागपूर.

तरी शासन मान्य महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ यांचेकडील वाहन चालकांची नेमणूकीमुळे माजी सैनिकांना न्याय मिळेल व म.न.पा.सुद्धा आपले कर्तव्य चोखपणे पार पाडून नागरीकांना चांगल्या प्रकारे सेवा उपलब्ध करुन देईल.

तथापि सदर कामी ३८ वाहन चालकांची (रिलीव्हर सह) आवश्यकता भासणार असून त्याकामी दरमहा खर्च व वार्षिक खर्च खालील प्रमाणे येणार आहे.

| | | दरमहा खर्च. | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| अ) | रिल्हीव्हर ड्रायव्हर. | ३,५०,७०२/- | ४२,०८,४२४/- |
| ब) | विदआऊट रिल्हीव्हर ड्रायव्हर. | २,९३,८१६/- | ३५,२५,७९२/- |

सदर मासिक पगारापोटी रक्कम ही मेस्को कंपनी पुणे येथी दरमहा वर्ग करावी लागेल.

तरी या कामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ४२,०८,४२४/- चे खर्चास मंजुरीस व पुढील कार्यवाहीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

बजेट तरतुद - सन २००८-२००९

खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे.

रु.३०,००,०००/-

झालेला खर्च - रु. निरंक.

सबब मुख्य स्वच्छता निरीक्षक व शाखा अभियंता यांचे सहीसह मा.महासभेपुढे ठेवणेकरीता आदेशार्थ सादर.

यावर वैद्यकीय आरोग्याधिकारी यांचा अभिप्राय की, १२ व्या वित्त आयोग निधी मधुन उपलब्ध होणारा वाहनासाठी कंत्राटी पध्दतीने वाहन चालकांची नेमणूकी संदर्भात प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्य लेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव तथापि अंदाजपत्रकीय तरतुदी नुसार अधिक खर्च झालेस पुर्न नियोजन घेणे आवश्यक.

यावर मा.मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय की, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मासैम १०९९/४३९०/प्र.क्र.२४४/९९/०८ दिनांक १४ नोव्हेंबर २००२ अन्वये महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ पुणे यांचेकडुन वाहन चालक कंत्राटी पध्दतीने भरणेस व खर्चास मान्यतेस्तव सादर. सन ०८-०९ व्सर तरतुदीतून खर्च करता येईल.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ " नुसार प्रस्ताव मा.महासभे समोर ठेवणे योग्य आहे. मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट वैद्यकिय आरोग्याधिकारी, मुख्यलेखापरिक्षक, मुख्यलेखाधिकरी, मा.उपायुक्त (कर) ,मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

चर्चा :

मा.श्री.दिप चव्हाण - महानगरपालिकेकडे एकुण किती गाडया आहेत ? महानगरपालिकेकडे एकुण ड्रायव्हर किती आहेत. किती ड्रायव्हरच्या जागा रिक्त आहेत याबाबत खुलासा करावा.

यावर श्री.मेहेत्रे यांनी खुलासा केला असता १९ गाडया आणि २८ ड्रायव्हर आहेत असे सांगितले.

मा.श्री.दिप चव्हाण - ४ रिक्त पदे आवश्यकता असतांना अद्यापी का भरली गेली नाहीत.

मा.महापौर - सदरच्या जागा त्वरीत भरणे बाबत आस्थापना विभागास आदेश दिले.

मा.श्री.आगरकर - ड्रायव्हरची पदे किती दिवसात भरली गेली नाहीत त्यामुळे महानगरपालिकेचा तोटा झाला किंवा काय फायदा झाला या बाबत खुलासा करावा. व माहिती अद्यावत आस्थापना विभागाने का ठेवलेली नाही.

मा.श्री.दिप चव्हाण - ड्रायव्हर घेण्यांत येणार आहेत या महानगरपालिकेच्या गाडयांचा मेंटनन्स कोण करणार आहेत व त्यासाठी कोण घेणार आहेत.

मा.श्री.कृ.द.जाधव - माजी सैनिक संघटनेचा जलतरण तलाव चालविण्याचा अनुभव विचारात घेता त्यांचे कडील ड्रायव्हर कामास लावल्यास गाड्यांना होणा-या अपघाताची जबाबदारी कोणाची राहील. त्याबाबत आपली नियमावली तयार करुन घेण्यांत यावी. याबाबत निविदा मध्ये नमुद केले आहे किंवा कसे ?

मा.श्री.अनंत जोशी - ४० टक्के आवारुचे काम ५ ते ७ टक्के लेबर कॉन्ट्रॅक्ट वर होईल याबाबत निगोसिएशन केले पाहिजे.

मा.महापौर - महानगरपालिकेने कचरा उचलणे व वहातुकीसाठी खाजगीकरण करावयाचे ठरविले असतांना एवढया मोठया प्रमाणात वाहने घेण्याची आवश्यकता नव्हती. याची जबाबदारी आयुक्त यांचेवर आहे. हा विषय प्रशासन यांच्या हट्टामधुन आलेला आहे.

मा.उपमहापौर - खाजगी करणामधुन हे काम शक्य होते. एवढया मोठया प्रमाणावर गाडया घेतल्यास महानगरपालिकेला गाडया लावण्यासही सध्या जागा उपलब्ध नाही.

मा.श्री.आगरकर - अशा प्रकारे माहिती असेल तर सदरचा विषय सिरीयस आहे मात्र यामधुन मार्ग काढला गेला पाहिजे आवश्यकता असल्यास याबाबत समिती नेमण्यांत यावी.

मा.श्री.कृ.द.जाधव - हा विषय गंभीर आहे. वाहनांसाठी दीड ते दोन कोटी रुपये खर्च होणार आहेत. ड्रायव्हर मेंटेनन्स इंधन इत्यादीचा खर्च महानगरपालिकेस करावा लागणार आहे. त्यामुळे असे सुचवावेसे वाटते की, आयुक्त, शहर अभियंता यांना शासनाकडे पाठवुन द्यावे.

मा.महापौर - सभेला आयुक्त उपस्थित नाहीत त्यामुळे हा विषय पुढे आयुक्त यांच्या उपस्थितीत घेण्यांत येईल असे सुचविले.

मा.श्री.कृ.द.जाधव - आयुक्त रजेवर गेल्यास उपायुक्त हांगे यांना चार्ज देणेबाबत शासनास कळवावे.

--*--

ठराव : ठरविण्यात येते की, सभागृहात झालेली चर्चा व कल पाहता सदरचा प्रस्ताव येत्या महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणेत यावा.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव

अनुमोदक : मा.श्री.किशोर डागवाले.

सही /-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक :१२-०५-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : १. कोठी ते यश पॅलेस रस्ता लांबी २.०० कि.मी. २. नेप्ती चौक ते पत्रकार चौक रस्ता लांबी १.९५५ कि.मी.रस्त्यांच्या सुधारणा करण्याच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देवून निविदा प्रसिध्द करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : मा.महासभेच्या ठराव क्रमांक ७ दिनांक १८/१२/२००७ अन्वये शहरातील मुख्य १० रस्त्यांची सुधारणा करणेचे कामाकरीता मे.श्रीखंडे कन्सलटंट प्रा.लि. यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. यापैकी उपरोक्त दोन रस्त्यांची सविस्तर अंदाजपत्रके तयार केली आहेत अंदाजपत्रकांची छाननी करण्यात आली असून ढोबळ वाव खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | बाब | कोठी ते यश पॅलेस | नेप्ती चौक ते पत्रकार चौक |
|---|---|---|---|
| १ | एकुण लांबी | २००० मी. | १९५५ मी. |
| २ | विकास आराखडयातील रुंदी (मी.) | १८.२८ | २० |
| ३ | अंदाजपत्रकातील रुंदी (मी.) | १८ | २० / १५ |
| ४ | पृष्ठभागाचा प्रकार | डांबरी | डांबरी / कॉक्रींट |
| ५ | पुल / मो-यांची संख्या | ३ मो-या | ६ मो-या |
| ६ | पृष्ठ थराची जाडी | ६६५ मी.मी. | ६६५ / ७५० मी.मी. |
| ७ | फुटपाथ रुंदी | १.५० मीटर दुतर्फा | १.५० मीटर दुतर्फा |
| ८ | गटरची व्यवस्था | होय | होय |
| ९ | अंदाजित किंमत | ९२०.७१ लाख | १०७०.८५ लाख |

उपरोक्त अंदाजपत्रकांची तांत्रिक दृष्टया छाननी करण्यात आली असुन तरतुद सर्व साधारणपणे योग्य आहेत. या दोन रस्त्यांच्या कामासाठी आजमितीस अंदाजे रुपये १९९१.५६ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सन २००८-०९ मध्ये शहरातील मुख्य रस्त्यांचे काम करणेसाठी रुपये ३०५.०० लक्ष टोकन तरतुद करण्यात आली आहे. निधीसाठी शासनाचे अनुदान किंवा कर्ज काढणे असे दोन पर्याय आहेत. शासनाकडे पत्र क्र.४३८७ दिनांक ३१/३/०८ अन्वये रुपये ६०.०० कोटीची मागणी केलेली आहे. तसेच पत्र क्रमांक ४३७४ दि.२७-३-०८ अन्वये रूपये २५.०० कोटीचे कर्ज काढण्यासाठी शासनाचे परवानगीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. मा.महासभा ठराव क्र. २ दि.२०-२-०८ अन्वये सदर प्रकल्पासाठी विकासभार निधीतुन रूपये ३.०० कोटी वर्ग करावेत असे आदेश आहेत.

तसेच तीन रस्त्यांपैकी नेप्ती चौक ते पत्रकार चौक या रस्त्याचे कामाची निविदा दि.१३-०४-०८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. व सदर निविदा विक्री कालावधी १५-४-०८ ते ९-५-०८ अखेर आहे. व निविदा स्विकृती दि.१२-५-०८ रोजी ठेवण्यात आलेली

आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत १०,७०,८५,००० /- होत आहे. तसेच उर्वरित दोन रस्ते १. कोठी ते यश पॅलेस रस्ते करीता अंदाजे ९,२०,७१,००० /- २. पाईप लाईन रोड रस्ते करीता अंदाजे ८,००,००,००० /- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी कर्ज काढण्याच्या प्रस्तावासाठी व उपरोक्त तीन रस्त्यांच्या किंमतीस प्रशासकीय मान्यता आवश्यक आहेत. त्याप्रमाणे प्रस्ताव मा.महासभेच्या मान्यतेस सादर.

यावर कार्यकारी अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे निर्णयास्तव.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, विकासभार निधीतुन रक्कम वर्ग करणेबाबतचा प्रस्ताव बांधकाम विभागाने सादर करून सदर रक्कम रस्ते विकास प्रकल्प या लेखाशिर्षाखाली जमा करणे आवश्यक आहे. नगर रचना विभागाचा त्यासाठी अभिप्राय घेणेही आवश्यक राहील. बांधकाम विभागाने प्रस्तावित केल्याप्रमाणे प्रशासकीय मान्यतेस्तव व अवलोकनार्थ मा.महासभेपुढे ठेवणे योग्य.

यावर नगर रचनाकार यांचा अभिप्राय की, विकास योजनेतील रस्ता असल्याने विकासभार निधीमधुन सदर रस्ता विकसित करणेस नगर रचना विभागाची हरकत नाही.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, " अ " च्या अनुषंगाने अभिप्राय मिळावे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित महासभे समोर ठेवणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे प्रस्ताव ठेवा.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट कार्यकारी अभियंता , शहर अभियंता , मुख्य लेखा परिक्षक, मुख्यलेखाधिकारी, नगर रचनाकार , मा.उपायुक्त (सा) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

**चर्चा -**

मा.श्री.शकरराव घुले - पत्रकार चौक ते अप्पु चौक ते नेप्ती चौक या पुर्वी सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्यांत आलेले होते त्याची जबाबदारी कोणावर राहील. हे काम पूर्ण न झाल्यास त्याची कार्यवाही का केली नाही. व त्या ठेकेदारास काळया यादी का घातले गेले नाही याचा खुलासा करावा. सदर रस्त्याचे एस्टीमेंट आता १० कोटींच्या वर गेलेले आहे. या रस्त्याकरीता कर्ज काढण्याची भुमिका घेतली गेली आहे. महानगरपालिकेला बरेच देणे आहे. त्यामुळे कर्ज काढण्यासाठी शासनाची मंजूरी घ्यावी लागणार आहे. रस्ते करतांना कॉक्रीट आवश्यक असल्यास जरुर करावे. पत्रकात वसाहत ते अप्पु चौक ते दिल्लीगेट ते नेप्तीचौक हा रस्ता डांबरी करावा. ठेकेदाराकडुन याबाबतची गॅरंटी घ्यावी १० कोटींच्या वर हे बजेट आहे. नाहक पैसाजास्त खर्च करु नये. लवकरच महानगरपालिकेची जकात बंद होउ शकेल त्यामुळे अडचणी येतील. या रस्त्यावर यापुर्वी ठेकेदारांनी काम केलेले असतांना नुकसान केंलेले आहे. साईडच्या गटारींचे काम झालेले नाही. ठेकेदारांनी काय काम केले यास जबाबदार कोण आहे याचा खुलासा करावा.

यावर अभियंता श्री.मगर यांनी खुलासा केला.

मा.श्री.फुलसौंदर - यापुर्वी रस्त्या बाबत एम.एस.आर.डी.सी कडुन रस्ते करुन घेणे बाबत विचारणा करण्यांत आली होती. त्या मंडळास हे काम देण्यात यावे.

मा.श्री.आगरकर - वस्तुस्थिती अशी आहे की, पाठीमागील ठेकेदार यांनी डांबरीकरणाचे काम सोडुन दिलेले आहे. चांगले काम करणारे ठेकेदार /लोक महानगरपालिकेला नको आहेत. याबाबत महानगरपालिकेने निरपेक्ष बुध्दीने निराकरण केले पाहिजे. रस्त्याच्या कामामध्ये ज्या अपप्रवृत्ती घुसल्या आहेत त्यास पायबंध बसला पाहिजे. ठेकेदार काम का करत नाही तेही गांभीर्यानं पाहिले गेले पाहिजे. यापुर्वीचे ठेकेदार महानगरपालिकेस कंटाळुन निघुन गेले आहेत. नविन लोक कंत्राटदार येत नाहीत.

मा.श्री.कृ.द.जाधव - या रस्त्याचे व चौकाचे टेंडर निघाले आहे काय निविदा प्रसिध्द करणे.

याबाबत शहर अभियंता यांनी खुलासा केला.

मा.श्री.शं.ह.घुले - मागील किती रस्त्यांची कामे केली यास जबाबदार कोण आहेत याचा खुलासा करावा.

यावर शहर अभियंता यांनी खुलासा केला की, कर्ज प्रस्ताव मंजूर झाला नाहीतर यश पॅलेस ते कोठी व पाईप लाईन रस्त्याचे टेंडर काढण्यांत येणार नाही.

मा.श्री.कृ.द.जाधव - महानगरपालिकेच्या वतीने जी जकात वसुल केली जात आहे. ती चांगल्या रितीने वसुल होत आहे. याबद्दल मी जकात विभागातील सर्व कर्मचा-यांचे अभिनंदन करतो व त्यांची हिंमत त्यांनी दाखवुन दिली आहे याबद्दल मी त्रिवार अभिनंदन करतो. शेवटी रस्त्याचा विषय मंजूर करावा असे सुचवितो.

मा.श्री.आगरकर - सदर प्रस्तावास अनुमोदन देवुन सांगितले की, महानगरपालिकेची लायबलिटी सध्या ९९ लाखाची आहे तथापि एमएसईबी व इतर यांची १४० कोटींची लायबलिटी आहे. कर्जा अभावी पैसे नाही म्हणुन योजना रखडु देवु नका व या बाबत वस्तुस्थितीचा विचार करावा.

मा.महापौर यांनी सांगितले की, याबाबत मे.शासनाच्या फॉरमॅट मध्ये माहिती दिल्यानंतर महानगरपालिकेस कर्ज मिळणार आहे.

मा.श्री.आसाराम कावरे - रस्ते एमएसआरडी कडुन का करुन घेत नाहीत.

--*--

ठराव : ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.कृ.द.जाधव

अनुमोदक : मा.श्री.अभय आगरकर.

ठराव बहुमताने मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक :१२-०५-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील केडगांव प्रभागाकरीता UIDSSMT योजनेंतर्गत मंजुर झालेली पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडुन राबविणेबाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नव्याने समावेश झालेल्या केडगाव प्रभागासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना करण्याचे प्रस्तावित केले होते. व सदरची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळामार्फत राबविणेबाबत महानगरपालिकेच्या विचाराधीन होते.

याच संदर्भात दि. २१ व २२ जून २००६ रोजी म.जी.प्राधिकरणाच्या मुख्य अभियंत्यांची बैठक सदस्य सचीव, म.जी.प्रा. मुंबई यांचे कार्यालयात संपन्न झाली होती. सदर बैठकीत वरील योजना केंद्रशासनाच्या UIDSSMT योजनेत संमावेश करण्याचा निर्णय झालेला होता.या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सदर विषयीचे प्राप्त पत्रात प्रस्तावित योजना ही मा.केंद्रशासनाच्या UIDSSMT योजनेअंतर्गत समावेश करण्यास संमती दर्शविणारा म.न.पा. कडील ठराव पारीत करून तो महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळास सादर करण्याची विनंती केली होती. तसेच सदरची पा.पु.योजना UIDSSMT च्या आकृतीबंधाप्रमाणे केल्यास केंद्रशासनाचे ८०% अनुदान , राज्यशासनाचे १०% अनुदान प्राप्त होवू शकते. व उर्वरीत १०% अनुदान महानगरपालिकेस फक्त लोकवर्गणी म्हणून जमा करावे लागते. त्यामुळे महानगरपालिकेस मोठया प्रमाणात शासकीय अनुदान योजना राबविण्यासाठी प्राप्त होवू शकेल. व योजनेच्या आकृतीबंधापेक्षा अधिक प्रमाणात आर्थिक भार सोसावा लागणार नाही. इ. बाबत म.जी.प्रा.कडून सूचीत करण्यात आले होते

त्यानुसार मनपा कडून UIDSSMT योजनेअंतर्गत समावेश करणेविषयी संमती दर्शविणारा ठराव क्र.५ दि. १३/९/२००६ अन्वये पारीत करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सादर केलेला होता. सदर ठरावाच्या अनुषंगाने केडगाव पा.पु.योजना UIDSSMT अंतर्गत राबविण्याच्या दृष्टीने म.जी.प्रा. मंडळाकडून सदर योजनेची अंदाजपत्रके व आराखडे तयार करण्यात आले. व सदरचा प्रस्ताव UIDSSMT अंतर्गत मंजूर होणेसाठी महानगरपालिकेकडे सुपूर्त करण्यात आला.

वरील नमुद योजनेचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून तयार करण्यात आलेली अंदाजपत्रके व आराखडे मा.केंद्रशासीत पुरस्कृत लहान व मध्यम शहरासाठी पायाभूत सुविधांचा विकास UIDSSMTअंतर्गत अमंलबजावणीसाठी तसेच मंजूरीबाबत पुढील कार्यवाहीसाठी अहमदनगर महानगरपालिकेकडून केडगाव पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रस्ताव मा.संचालक तथा आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनाल मुंबई यांचेकडेस सादर करण्यात आला होता प्रस्तावित योजनेसाठी मा. राज्यशासाच्या ४ थ्या राज्यस्तरीय मान्यता समितीची दि. ४/५/०७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये समितीने सदरहू योजनेस रक्कम रूपये २५.३९ कोटीच्या अंदाजपत्रकीय रकमेस मंजूरी दिली. त्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेकडून केडगाव प्रभागासाठी नळ पाणी पुरवठा योजनेस मा शासनाकडून UIDSSMT योजोअंतर्गत मंजूरी मिळाल्याने मा. शासनाशी आवश्यक तो करारनामा करून देणे कामी सविस्तर प्रस्तावावर मा.महासभा ठराव

क्र.५, दि.२१/७/२००७ अन्वये सदर विषयावर सभेमध्ये चर्चा होवून अहमदनगर महानगरपालिका स्वत:च्या उत्पन्नातून निधी उपलब्ध करून आवश्यक असलेल्या १० % लोकवर्गणीचा हिस्सा वेळोवेळी भरेल असा ठराव पारीत झालेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेकडून सदर योजनेसाठी मा.केंद्र शासनाकडून लवकरात लवकर अनुदान प्राप्त होण्यासाठी वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करण्यात आला.याकामी मा.केंद्र शासनाकडील ८०% अनुदानाच्या हिश्यापोटीचा पहिला हप्ता रूपये १०. १६कोटी तसेच मा. राज्य शासनाकडील १०% अनुदानाच्या हिश्यापोटीचा पहिला हप्ता रक्कम रूपये १.२७ कोटी असे मिळू-न एकूण रूपये ११.४३ कोटीचे अनुदान मा.अव्वर सचीव, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक नॅअरी-१००७/प्रक्र-५०/०८ /नवि-३३ दिनांक ३१ मार्च २००८ अन्वये सन २००७-०८ या आर्थिक वर्षात जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरीक, पुर्ननिर्माण अभियान अंतर्गत लहान व मध्यम शहरातील पायाभुत सुविधांचा विकास कार्यक्रम UIDSSMT या अभियाना खाली मंजूर होवून अहमदागर महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहेत. मंजूर झालेले अनुदान जमा करण्यासाठी UIDSSMT अहमदनगर महानगरपालिका या नावाने अक्सिस बॅक, स्वस्तिक चौक, अहमदनगर येथे स्वतंत्र सेव्हींग खाते उघडण्यात आलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिका मा.महासभा ठराव क्र.२ दि.२०/२/२००८ मधिल अनुक्रमे ५ नुसार " मा. शासाच्या UIDSSMT योजनेअंतर्गत मंजूर झालेली केडगाव पाणी पुरवठा योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचेमार्फत तांत्रिक पर्यवेक्षणाखाली [टेक्निकल सुपरव्हिजन] पूर्ण करण्यात यावी.सदरकामी अंदाजपत्रकीय रकमेच्या ५ % फि देण्यास ही सभा मंजूरी देत आहे. खर्च मंजूर " अशा प्रकारचा ठराव क्र.२, दि. २०/२/२००८ मधील अ.क्र.२५, पारीत झ ालेला आहे.या ठरावाच्या अनुषंगाने मा.आयुक्त साहेब यांचे सुचनेनुसार या याजनेचा सविस्तर अहवाल मा.महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

केडगाव पाणी पुरवठा योजनेस UIDSSMT अंतर्गत समावेश केलेला असल्यामुळे मा. शासनाकडूनच तांत्रिक मान्यता मिळताना सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्राकामधून ईटीपी चार्जेस पोटी १७.५ % रक्कम वगळूनच योजनेला मंजूरी मिळालेली आहे.ॲप्रझल मिळताना १७.५ % ईटीपी चार्जेस वगळूनच योजनेला मंजूरी मिळालेली आहे. त्यामुळे सदरची संपूर्ण योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून राबविली असती तर सदर योजनेसाठी महानगरपालिकेला मंजूर योजनेच्या १७.५ % इतकी रक्कम इर्टीपी चार्जेस म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास भरावे लागले असते. परिणामी महानगरपालिकेचा मोठा आर्थिक तोटा होण्याची शक्यता होती. याकरीता मा.शासाच्या धोरणानुसार सदरची योजाा ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडूच **प्रोजेक्ट मेनेजमेंट कन्सल्टंट** म्हणून राबविल्यास त्यांचे टेक्निकल सुपरव्हिजन या योजोसाठी महानगरपालिकेस मिळेल. व यापोटी फक्त अंदाजपत्रकीय फक्त रकमेचा ५% रक्कमच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास दयावी लागेल. व योजना महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली राबविता येईल. त्यामुळे महानगरपालिकेचे जवळपास १२.५% एवढी रक्कम बचत होण्यास मदत होणार आहे. यादृष्टीने विचार करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाशी आवश्यक तो विहीत नमुन्यातील करारनामा करून ५% इतकी रक्कम टप्प्याटप्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून **प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट** म्हणून राबविणेस मा.महासभेच्या ठरावानुसार योग्य होईल.

यानुसार केडगाव **प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट** म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविण्याचे पत्र संबंधित विभागास देण्यात भागासाठी UIDSSMT अंतर्गत मंजूर झालेली पा.पु.योजना आलेले आहे. त्याुसार संबंधिताकडून जाहिर निविदा मसूदा व निविदा सूचना महानगरपालिकेस सादर केलेला असू त्याआुषंगाो सदर योजोअंतर्गत खालील कामासाठी

महानगरपालिकेकडून जाहिर निविदा जिल्हास्तरावरील व राज्यस्तरावरील वर्तमान पत्रात दि.६/४/०८ प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| **कामाचे नाव-** केडगाव प्रभागासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना शुध्द पाणी पंपींग बसविणेचा पुरवठा करणे, उभारणी करणे, शुध्द पाणी उध्वनलिका पुरवठा करणे, अंथरणे, जोडणे, आर.सी.सी. एम.बी.आर. , इ.एस.आर. , गुरूत्ववाहिनी, वितरण व्यवस्था वॅाटर मीटर योजना चालविणे इत्यादी. | २२,५८,४६,८४४/- |

केडगाव पाणी पुरवठा योजना PMC म्हणून राबविताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळासोबत करारनामा करावा लागेल.यात महानगरपालिकेस PMC च्या शुल्कापोटी वेळोवेळी देय असणा-या देयकाचे विवरण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून करण्यात येणारी कामे उदा.-

- जाहिर निविदा मसुदा तयार करणे .
- डि.टि.पी.(निविदा पपत्र ) तयार करणे.
- प्राप्त निवीदा उघडलेनंतर तांत्रिक कागदपत्रे तपासणी करणे.
- तुलाात्मक तक्त्याचा अभ्यास करून म.न.पा.स अभिप्राय सादर करणे.
- योजनेच्या कार्यान्वयन कालावधीत कामावर देखरेख करणे
- तांत्रिक मार्गदर्शन करणे
- झालेल्या कामाचे मुल्यांकन करणे , रेकॉडिंग करणे व गुणवत्ता नियंत्रण करणे.

इत्यादी बाबींचा समावेश करावा लागेल .
सोबत करारनाम्याची प्रत व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाशी झालेला पत्रव्यवहार
जोडलेला आहे.

तरी वरील अहवालानुसार सदरची योजना PMC म्हणून राबविताना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळासमवेत करावयाचा करारनामा व तद्दनषंगीक बाबी मा.महासभेच्या मंजूरीस्तव सविनय सादर .

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, श्री.निकम , शहर अभियंता यांचे अभिप्रायासह सादर करावे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, पाणीपुरवठा विभाग प्रमुख समक्ष चर्चा करावी.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित प्रकरणी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण मंडळाशी करारनामा करणे करीता मा.महासभेच्या मंजुरीसाठी पाठविणे करीता मान्यतेस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट शहर अभियंता, उपायुक्त (सा) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

-- * --

चर्चा :

मा.श्री.सुनिल कोतकर - सदरचा प्रस्ताव महासभेपुढे मांडल्याबद्दल मी मा.महापौर श्री. संदिप कोतकर यांचे अभिनंदन प्रस्ताव मांडतो व याबाबत शासनाकडुन पहिला हप्ता दिलेला आहे याबद्दलही अभिनंदन करतो.

मा.श्री.गिरवले - सदरच्या प्रस्तावास माझे पुर्ण अनुमोदन आहे. याबाबत टेंडर मागविलेले आहेत. पाईपचे दर वाढलेले आहेत सदर बाबतीत अबावु दर येतात २५ कोटीच्या योजनेत ५० टक्के जादा आले तर कसे करायचे कंपनी मार्फत डायरेक्ट पाईप मागविण्यांत येवुन खोदाई व इतर खर्च ठेकेदाराकडुन करावा. पुर्वी जिंदाल कंपनी मार्फत जसे पाईप मागविण्यांत आले होते तसे मागवावे.

सध्या केडगांव आणि सारसनगर भागामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे याबाबत नियोजनाचा अभाव आहे तसे नियोजन करावे. पाणीपुरवठा विभाग हा एकाच नियंत्रकाकडे देण्यांत यावा. पाणी पुरवठयाचे वितरण जुन्या पध्दतीने होत आहे. पाणी पुरवठा टँकरला तोटया बसविण्या बाबतही कार्यवाही करुन घेण्यांत यावी. टँकर मार्फत सर्व सामान्य लोकांना पाणी मिळाले पाहिजे व टँकर खेपा वाढविण्यांत याव्यात.

मा.श्री.गारुडकर - मंजूर करावा असे सुचविले. केडगांव पाणी पुरवठा योजना मंजूर केल्या बद्दल सर्व केडगांव वासीय नागरिकांच्या वतीने अभिनंदन करतो.

मा.श्री.सुनिल कोतकर - महानगरपालिकने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचेकडुन त्यांचे रेट कॉन्ट्रॅक्ट सह खरेदी करण्यांत यावे किंवा महानगरपालिकेने सदरचे पाईप तातडीने मिळणेसाठी स्वतंत्र जाहिर निविदा मागवावी.

--*--

ठराव : " UIDSSMT " योजने अंतर्गत मंजूर असलेली केडगांव पाणी पुरवठा योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ योंच मार्फत प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्ल्टंट म्हणून करून घेणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच याकामी सोबतच्या करारनाम्यास मंजूरी देण्यात येत असून करारनामा व तद्नूषंगिक बाबी याबाबतचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येत आहे.

केडगांव पाणी पुरवठा योजने करीता जाहिर निविदेचा अपूरा प्रतिसाद पाहता तसेच डी.आय.पाईपचे बाजारातील वाढलेले दर पाहता, योजना मार्गी लावणेच्या दृष्टीकोनातून लागणारे विविध साईजचे पाईप्स महानगरपालिकेने स्वतंत्ररित्या खरेदी करून संबंधित ठेकेदाराला पुरवावेत. सदरहू पाईप्स महानगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचेकडून त्यांचे Rate Contract ( Handling Charges ) सह नुसार खरेदी करावेत, अथवा महानगरपालिकेने सदरहू पाईप तातडीने मिळणेसाठी स्वतंत्र जाहिर निविदा मागवून खरेदी करणेस ही सभा मान्यता देत आहे. सदरची योजना अर्धवट स्वरूपात राहणार नाही. यादृष्टीने एकच निविदा प्रसिध्द करण्यात यावी. यात पंप मशिनरी + मुख्य जलवाहिनी , पाण्याच्या टाक्या व त्यास जोडणा-या पाईप लाईन व वितरण व्यवस्था असे स्वतंत्र गट करावेत.

खर्च मंजूर. ठराव सर्वानूमते मंजूर.

सुचक : मा.श्री.सुनिल रामदास कोतकर

अनुमोदक : मा.सौ.संध्या बाळासाहेब पवार.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दिनांक :१२-०५-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

--*--

प्रस्तावाचा मजकुर :

१२-०५-२००८.

**विषय क्रमांक १ - मागील इतिवृत्त कायम करणे :-**

मा.श्री.दिप चव्हाण - जलतरण तलावाचे बाबतीमध्ये तांत्रिक सल्लागाराचा अहवाल आला आहे काय तसेच पठाण कुटुंबियांना रु.१,००,०००/- लाख देण्यांत आले किंवा पैसे देण्यांत आले आहे काय.

याबाबत श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर यांनी खुलासा केला की, समिती नेमली आहे त्यांच्या तीन बैठका झालेल्या आहेत. तांत्रिक सल्लागारांशी चर्चा चालु आहे. अहवालाचे काम चालू आहे. अहवाल पुढे चालु ठेवण्यांत येईल.

मा.उपमहापौर - फिल्ट्रेशन चे काम चालू आहे. प्लॅट चालू करणे बाबत सुचविले.

मा.श्री.दिप चव्हाण - जलतरण तलावाची परिस्थिती पुर्ण वाईट झालेली आहे. स्वच्छता करणे बाबत काहीही कार्यवाही झालेली नाही. काही नागरिकांना पोहल्या नंतर वांत्या झाल्या. याबाबत मी कल्पना दिलेली आहे. प्लॅट दुरुस्त करणे बाबत माणुस नाही

त्यावर श्री.निकम यांनी टेंडरचे काम चालू असले बाबत सांगितले.

मा.उपमहापौर - सदर जलतरण तलावाचे शौचालयास औटलेट नाही. पाणी बाहेर जात नाही पहाणी करुन कारवाई करण्याचे शहर अभियंता यांना सुचविले.

मा.श्री.कृ.द.जाधव - जलविहार बाबत चर्चा चालू करणे. दरवाढ कशीकाय केली आहे. कर व दर दि.२० फेब्रुवारी पर्यंत निश्चित केले जातात हे दर आगोदर का लागु केले नाहीत. ? जलविहार मधील संडास बाथरुमच्या औटलेटला नैसर्गिक उतार दिल्यास अडचण येणार नाही. तसेच उद्यानाचे कंम्पौंडचे काम अद्याप झालेले नाही ते करुन घेण्यांत यावे.

मा.श्री.उडाणशिवे - मागील प्रस्ताव क्रमांक २ मध्ये कर्मचा-यांच्या आरोग्य विषयक सुविधांसाठी प्रतिपुर्ती योजनेमध्ये आनंदऋषी हॉस्पीटलचा समावेश करावा.

मा.श्री.आगरकर - मागील सभेच्या वेळी मी चर्चा उपस्थित केली होती. सिध्दार्थनगर येथील हायमास्ट बाबत सामजस्याची भुमिका घेवुन एक हायमास्ट केंव्हा काढला जाणार आहे. तो काढुन योग्य ठिकाणी जेथे आवश्यकता असेल तेथे लावण्यांत यावा. महापौर म्हणुन आपण शहराचे पालक आहात. सिध्दार्थ नगर येथे आधी लावलेला व मंजूर केलेला हायमास्ट ठेवुन नंतर लावलेला काढावा.

मा.महापौर - यांनी यावर अहवाल द्यावा व त्याबाबत कार्यवाही करावी असे सुचविले.

मा.श्री.दिप चव्हाण - मागील सभेच्या विषय क्रमांक ४ मध्ये वाढीव विकास योजनेमध्ये कीती अर्ज आले याचा खुलासा करावा.

मा.महापौर यांनी माहिती घेण्यांत येईल असे सांगितले.

मा.श्री.आगरकर - मागी सभा विषय क्रमांक ५ बाबत हायमास्ट केंव्हा काढणार ते सांगावे. यापुर्वी ४२ वाडया वस्त्या अंधारात आहेत असे मी सुचविले होते.

मा.श्री.दिप चव्हाण - यांनी सांगितले की, याबाबत पहिल्या हायमास्ट चे बिल दिलेले आहे व वर्क ऑर्डरही दिलेली आहे.

मा.महापौर - यांनी हायमास्ट बाबत यादी तयार करावी नंतर त्यावर कार्यवाही करण्यांत येईल असे सांगितले. जे हायमास्ट मंजूर आहेत ते चालू करावेत व त्याचा अहवाल महानगरपालिका सभेपुढे देण्यांत यावा.

मा.श्री.गिरवले कैलास - हायमास्ट वर नांव लावण्यांत आलेली आहेत. ती नांवे काढुन घेण्याबाबत मागील ठराव मंजूर करणेंत आलेला आहे. परंतु ती नांवे कां काढली गेली नाही याचा खुलासा करावा.

मा.उपमहापौर - दोन महिन्या नंतर आचारसंहिता लागणार आहेच त्यानंतरही नांवे काढुन टाकावी लागणार आहेत तेंव्हा माळीवाडया पासुन याला सुरुवात करु.

मा.सौ.कविता दहिफळे - अप्पुहत्ती चौक व त्याचा परिसर ही कचराकुंडी झालेली आहे त्याबाबत काय कार्यवाही करण्यांत आली याचा खुलासा करावा.

मा.महापौर - पुतळयाच्या आसपास अतिक्रमण असल्यास कारवाई करण्यांत येईल असे सुचविले.

**विषय क्रमांक २ - दुखवटयाचे प्रस्ताव :-**

मा.श्री.कृ.द.जाधव - माझे मित्र बांधकाम समितीचे सभापती व माजी नगराध्यक्ष श्री.सुरेशराव शेळके यांचे दु:खद निधन झाले आहे. ते नगराध्यक्ष असतांना शक्ती, भक्ती आणि युक्तीने काम करीत असत असे त्यांच्यामध्ये गुण होते. त्यांचा स्वभाव प्रेमळ होता. त्यांच्या दु:खद निधनाच्या दिवशी ब-याच कर्मचारी यांना अंत्यविधीस उपस्थित रहाता आले नाही. तेंव्हा विद्यमान नगरसेवकांचे निधन झाल्यास महानगरपालिकेला सुट्टी देण्यास हरकत नाही. याबाबत जरुर ती कार्यवाही करावी व आजची सभा तहकुब करावी असे सांगितले.

मा.श्री.भगवान फुलसौंदर - महानगरपालिकेचे पहिले सभागृह नेते नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष स्व.सुरेशराव शेळके यांचे स्मरणार्थ नेप्तीगेट चौकास संभाजी महाराज चौक नामकरण करावे व त्यांच्याच प्रयत्नातुन साकार झालेल्या नालेगांवातील शिवपवन मंगलकार्यालयास " सुरेश राव शेळके शिवपवन मंगलकार्यालय " असे नांव देण्यास हरकत नाही.

मा.श्री.अभय आगरकर - कै.सुरेशराव शेळके हे एक अभ्यासु आणि मुत्सददी नगरसेवक होते. प्रशासन यांच्यामध्ये सामंजस्याची भुमिका ठेवुन काम करीत असत त्यामुळे अनेक चांगले निर्णय घेणारा आमचा खरा सहकारी गमावला आहे. त्यांनी अनेक चांगल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे. शहर पालिकेमध्ये अनेक उत्पन्नाची साधने शहर विकासाचे प्रस्ताव त्यांनी सादर केले. नालेगावातील शिवपवन मंगलकार्यालय हे सर्वसामान्यां साठी मंगलकार्यालय उभारुन सामान्य जनांना दिलासा दिलेला आहे. ही त्यांच्या कामाची पावतीच आहे. ते अभ्यासू भुमिका सातत्याने मांडत असत परंतु या जगामध्ये प्रत्येकजण आला तो जाणार आहेच परंतु त्यांचे अकाली जाणे हे मनाला चुटपुट लावणारे होते. शहराच्या इतरही विकास योजनेमध्ये त्यांचे नांवे देवुन त्यांची स्मृती जतन करावी.

मा.श्री.दिप चव्हाण - माजी नगराध्यक्ष व महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक श्री.सुरेशराव शेळके, यांचे दु:खद निधन झाले. विद्यमान नगरसेवकाचे निधन झाल्यानंतर महानगरपालिकेमध्ये असा पहिलाच प्रसंग आलेला आहे त्यामुळे महानगरपालिका कार्यालय अशा प्रसंगी अतयावश्यक कामकाजाशिवाय बंद ठेवण्याचा निर्णय घ्यावा व सुट्टीची प्रोव्हीजन करावी त्यास मी पाठींबा देत आहे.

मा.श्री.अंबादास गारुडकर - माझे सहकारी नगरसेवक माजी नगराध्यक्ष कै.सुरेश शेळके यांच्या दु:खद निधनामुळे शहराची हानी झालेली आहे. त्यांच्या अंत्यविधी करीता अर्धा दिवस तरी कार्यालय बंद ठेवणे आवश्यक होते.

मा.श्री.त्रिपाठी - कै.सुरेशराव शेळके यांच्या दु:खद निधनाचा दिवस नाथ षष्टीचा होता. कै.सुरेशराव शेळके हे अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचे नगरसेवक होते. त्यांनी अनेक पदे भुषविली. सिना नदी अतिक्रमण, संभाजी महाराज पुतळा उभारणे ही त्यांच्या जीवनातील संभाव्य कामे होती ती कामे करुनच त्यांना श्रंध्दांजली अर्पण करावी व कार्यालयास सुट्टी न देता जास्तीत जास्त काम करावे.

मा.श्री.शंकरराव घुले - माझे जवळचे सहकारी कै.सुरेशराव शेळके यांचा आणि माझा जवळचा संबंध होता ते खुप चांगले कुस्तीगिर होते व शहराचे नगराध्यक्ष पदही त्यांनी भुषविले. कुस्तीचे धडे त्यांनी कोल्हापुर येथे घेतले. ते अभ्यासू नगरसेवक होते. त्रिपाठी यांच्या मताशी मी सहमत आहे. कै.शेळके यांच्या कुटुंबियांच्या दु:खात मी सहभागी आहे.

मा.श्री.आसाराम कावरे - स्व.सुरेशराव शेळके माजी नगराध्यक्ष यांच्या आजाराचे निदान खरोखरच झाले नाही ते चांगले पहिलवान होते. व अभ्यासू नगरसेवक होते. शिवपवन मंगलकार्यालयास त्यांचे नांव देण्यांत यावे मी त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

मा.श्री.अनंत जोशी - आतापर्यंत अनेक वक्त्यांनी जे मत व्यक्त केले त्या मताशी मी सहमत आहे. त्यांना श्रंध्दांजली म्हणुन त्यांच्या मनातील धर्मवीर संभाजी महाराज पुतळा लवकर बसवावा. मी वैयक्तीक व भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

मा.महापौर - कै.सुरेशराव शेळके माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक यांच्यामध्ये विविध भुमिका साकार करतांना सामजस्याची भुमिका घेण्याची ताकत होती तसेच नविन नविन संकल्पना राबवुन काम

करवुन घेण्याची ताकद होती. सन १९९२ पासुन छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्याचे प्रयत्न तयांनी केले लवकरच तो पुतळाही उभारला जाणार आहे. त्या रुपाने त्यांचे हे एक स्मारक होणार आहे. शहर वासियांच्या वतीने व सभागृहाचे वतीने मी त्यांच्या कुटुंबियांचे दु:खात सहभागी आहे. त्यांच्या स्मरणार्थ शिवपवन मंगलकार्यालयांस त्यांचे नांव देण्यांत मान्यता देण्यांत यावी. व त्यांचे दु:खद निधना निमित्त आजची सभा पाच मिनीटे तहकुब करण्यांत येत आहे.

**विषय क्रमांक : ३ - ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.**

**- मा.श्री. सुनिल त्रिपाठी** - सदर विषय मा.महापौर यांनी सभागृहापुढे आणल्या बद्दल प्रथम मी त्यांचे अभिनंदन करतो. यामधुन एकंदर सात कोटीच्या शहर विकासासाठी रस्ते होणार आहेत. तथापि हा एकंदर निधी घेण्यासाठी गटर दुरुस्ती हेडवरील २० लाख, ड्रेनेज दुरुस्ती हेडवरील २० लाख तसेच रस्ते मजबुतीकरण व शहरात नविन पाईप लाईन टाकणे २० लाख असे एकुण ६० लाख हा निधी पुर्वीच्या अंदाजपत्रकामधुन कमी केला जाणार आहे. मात्र या हेडवरील आवश्यकता पाहता या हेडवरील जास्त तरतुद करावयास पाहिजे होते.

सारसनगर बाबत पुर्णपणे विचार केलेला नाही त्याचा विचार केला पाहिजे. यामध्ये महानगरपालिकेने ज्या-त्या प्रभागामध्ये विकास कामे करणे ही प्रकृती आहे. मात्र तो विकास निधी इतरत्र वळविला गेल्यास ती विकृती होईल. परंतु मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला तर त्यासच संस्कृती म्हणता येईल तेंव्हा असा विचार करुन अत्यावश्यक रस्ते घेण्यांत यावेत. त्यामध्ये कब्रस्थान ते सोलापूर रोड शांतीनगर रस्ते करतांना ड्रेनेज नाही. याचा विचार केला जात नाही. सारसनगर ते मानधना यमुनानगर येथे कॉक्रीट कामे होत आहेत पण तत्पुर्वी त्याठिकाणी पाण्याची लाईन नाही. ड्रेनेज लाईन नाही ती तत्पुर्वी करणे आवश्यक आहे. यास जबाबदार कोण आहे. रस्ते करण्यापुर्वी पाणी आणि ड्रेनेज लाईन करणे हे अत्यावश्यक आहे.

यावर आयुक्त यांनी खुलासा केला की, शहर अभियंता यांना अंदाजपत्रके तयार करणे बाबत सूचना दिलेल्या आहेत.

यावर मा.महापौर यांनी सदर ठिकाणचे पाईप लाईनचे प्रस्ताव मार्गी लावणे बाबत शहर अभियंता यांना सूचना केल्या.

**मा.श्री. सुनिल त्रिपाठी** - शांतीनगर ते नामगंगा गटर करणे आवश्यक आहे.

यावर शहरअभियंता यांनी खुलासा केला की, प्रस्ताव तयार केलेला होता तथापि मार्गी लागलेला नाही.

**मा.श्री.सुनिल त्रिपाठी** - त्यामुळे महानगरपालिकेचे जे नुकसान होणार आहे. त्यास जबाबदार कोण आहे.

**मा.श्री.आसाराम कावरे** - यापुर्वी अहमदनगर शहरातील प्रमुख चार रस्ते महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडुन करुन घेण्याविषयी सुचविलेले होते तथापि सदरचे रस्ते अद्यापी झालेले नाहीत. मी माझ्या बहुजन समाज पक्षाच्या वतीने मी यासाठी उपोषण करणार आहे यास तुम्ही जबाबदार रहाल असे सुचविले.

**मा.श्री.भगवान फुलसौंदर** - महानगरपालिकेला शासनाकडुन रस्त्यांसाठी साडे तीन कोटी रुपयांचे अनुदान मिळाले आहे ही एक चांगली बाब आहे रस्ते चांगले झाले पाहिजेत शहरामधील ६५ नगरसेवकांच्या रस्त्यांबाबत तक्रारी आहेत. रस्त्याच्या कामासाठी यापुर्वी पैसे नाहीत म्हणुन कामे होवु शकली नाहीत. आता मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध झालेला आहे. यामध्ये ख-या अर्थाने अहमदनगर शहराचा विकास होण्यासाठी प्रमुख मोठया महामार्गाचे रस्ते घ्यावेत व एम.एस.आर.डी.सी कडुन रस्ते करावेत. नगरकरांना अपेक्षित असलेले रस्ते घ्यावेत. सावेडी कडे जाणारा बालिकाश्रम ते सावेडी रस्ता प्राधान्याने घेण्यांत यावा. या करीता अधिकारी आणि मा.नगरसेवकांनी साथ दिली पाहिजे. रस्त्यांमुळे नागरिकांना फायदा होवु शकेल रस्ते रुंद होतील व त्याचबरोबर गटारी व ड्रेनेज लाईन याही होणे जरुरीचे आहे. आपण वेळोवेळी ठराव करतो परंतु ठरावाची अंमलबजावणी होत नाही.

डी.पी.आर मधील सिनानदीच्या बाजुने जाणारा रस्ता तयार केला तर नगरकर धन्यवाद देतील. सिनानदी रस्त्याचे काम पूर्ण केले तर त्या बाबत आपण धन्यवादास पात्र राहाल. त्याबाबत सर्व गांभीर्याने विचार करावा असे सुचविले. शहर विकास व्हावा ही सर्वांचिच इच्छा आहे. त्यामुळे सर्व शहराचा फायदा होईल असे रस्ते घेण्यांत यावेत. अंतरराष्ट्रीय ठेकेदार बोलवावेत.

**मा.श्री.कैलास गिरवले -** शहराचा विकास व्हावा अशी तुम्हा आम्हा सर्वांचीच इच्छा आहे. परंतु काही रस्त्याच्या विकास कामांमध्ये काही लोकप्रतिनिधी हस्तक्षेप करतात उदा - बागरोजा म्यु.पल कॉलनी येथील प्रस्तावित गटर व रस्ता ते बरोबर नाही. शहर विकास व्हावा यामध्ये व्यक्तीव्देश नाही. शहर विकास होण्यासाठी अतिक्रमणाकडे दोन अधिकारी नेमण्यांत यावेत. गावठाण व गावठाण बाहेर असे दोन भाग करावेत.

यावर मा.आयुक्त सो, यांनी सांगितले की, शहर विकास करण्यासाठी नागरिकांच्या सहभागा शिवाय नगर विकास होवु शकणार नाही. सर्व पक्षीय १०० टक्के सहकार्य असल्याशिवाय शहराचा चेहरा मोहरा बदलता येणार नाही.

मा.श्री.अनंत जोशी - श्री.सतिष मैड - श्री.अशोक कानडे, -श्री.आसाराम कावरे, - श्री.कैलास गिरवले हे सर्व एकत्रित बोलण्यास उभे राहिले.

**मा.श्री.सतिष मैड** - रस्ते करतांना प्रथम नाल्या व ड्रेनेज लाईन करुनच रस्ते करावेत. अतिक्रमणा बाबत विषय उपस्थित झाला असता

**मा.श्री.कैलास गिरवले -** यांनी गंजबाजार फ्रुट मार्केटच्या जागेबाबत प्रश्न उपस्थित केला सदरची जागा सन १९९० पासुन भाडयाने दिली आहे. सदर जागेचे बांधकाम पुर्ण केलेले नाही. फ्रुट मार्केट येथे अतिक्रमण आहे काय परंतु ते काढले जात नाही. तथापि यामध्ये काही अधिकारी ३,५००/- रु. महिना घेतात असे सांगितले.

**मा.श्री.सतिष मैड** - त्याचप्रमाणे सावेडी रोडवरील बिग बजार मार्केट येथील महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण आहे. त्याठिकाणी महानगरपालिकेची जागा असलेबाबत बोर्ड लावावा असे सांगितले.

**मा.श्री.कैलास गिरवले** - रस्त्यांच्या प्रस्तावामध्ये महात्मा फुले नगर, कपिलेश्वर नगर, मधुबन कॉलनी खडीकरण व रस्ता करणे बाबत तसेच सारसनगर येथील कामांचा समावेश करावा.

**मा.श्री.सतिष मैड** - श्री.सातपुते इंजिनिअर यांनी जे प्रकरण दिलेले आहे. त्यामध्ये अगोदर नाल्या करुन घेण्यांत याव्या.

**मा.सौ.सुनिता साहनी** - वॉर्ड क्रमांक ३ मधील झेड पी शाळा ते इकरा स्कुल इ. रस्त्यांचे प्रस्ताव या यादीत घेण्यांत यावेत. असे सुचविले.

**मा.श्री. दिप चव्हाण** - शासन परिपत्रक मुद्दा क्रमांक ३ चा अर्थ काय आहे.

यावर शासन निर्णय वाचुन दाखविणे बाबत सुचविले सदरचा निर्णय वाचुन दाखविण्यांत आला.

**मा.श्री.दिप चव्हाण** - यांनी बजेटला मंजूरी का घेण्यांत आली नाही याची काय अडचण आहे सदर बोर्डापुढे मागील इतिवृत्त का नाही घेतले.

**मा.श्री.शं.ह.घुले** - यांनी इतिवृत्त घेण्यांत येईल असे सुचविले.

**मा.श्री.सुळ दिपक, उपमहापौर** - महानगरपालिकेत निरनिराळया रस्त्यांचे निविदा दर (टेंडर) दाखल होतांना ठेकेदार वाढीव दर देतात तसेच त्यांना डांबराचेही दर वाढुन दिले जातात. त्याबाबत त्यांनी जादा कामाचे दर टाकु नयेत व हे वाढीव दर कशाप्रकारे देत आहात याबाबत शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

या प्रस्तावातील कामांचे टेंडर काढतांना प्राईस एक्सलेशन क्लॉज ठेवावा व त्याला इतर वाढ देता येणार नाही असे नमुद करावे

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, वेळेत कामे न झाल्यास त्यांना दंड करण्यांत यावा ठेकेदार यांनी काम वेळेत केले नाही तर. डांबराचे रेट मिळणार नाही. व दंडाची कार्यवाही करण्या बाबत यापुर्वी महासभेने आयुक्त यांना अधिकार दिलेले आहेत.

यावर मा.आयुक्त यांनी सुचविले की, यापुर्वी ठेकेदारांना जी कामे दिलेली आहेत ती कामे पुर्ण झालेली नाहीत याबाबत श्री.मगर सिव्हील इंजिनिअर व पालवे शहर अभियंता यांनी सात दिवसात कामे सुरु केलेली नाहीत त्यांची यादी सादर करावी व सदरच्या ठेकेदारांची नांवे काळया यादीत टाकावीत.

उपमहापौर सुळ यांनी सांगितले की, ५, १० व २० लाखांची कामे अशा प्रकारे कामांची कॅटॅगरी करावी.

**मा.श्री.अशोक कानडे** - शासनाने महानगरपालिकेला रस्ते विकासासाठी साडे तीन कोटीचा जो निधी उपलब्ध करुन दिलेला आहे व यासाठी मा.महापौर यांनी जे प्रयत्न केले याबद्दल त्यांचे खास अभिनंदन करतो व ते धन्यवादास पात्र आहेत. यामुळे नगर शहराचा चेहरा मोहरा बदलत आहे. रस्त्याचे रुप चांगले बदलत आहे. यामध्ये शासनाचे साडेतीन कोट व महानगरपालिकेचे साडेतीन कोटी उपलबध करुन एकंदर सात कोटींची विकास कामे होत असलयाने ख-या अर्थाने महापौर व सर्व सहकारी यांचे कौतुक करण्यासारखी गोष्ट आहे. विकास कामांमध्ये राजकारण आणणार नाही. तसेच मा.आयुक्त हांगे साहेब यांनी जी भुमिका आज सभागृहामध्ये घेतली आहे. ती चांगली आहे.

उपरोक्त प्रस्तावामध्ये यादी दुरुस्त करावी व त्याप्रमाणे अंदाजपत्रके करावी अशी विनंती केली व हे बदल करण्याचे अधिकार मा.महापौर यांना देण्यांत यावेत. तसेच गांधीनगर रस्त्याबाबत जी.आय.पाईपची भुमिका काय आहे.

**मा.श्री.शेख मुदस्सर** - मकुंदनगर येथील पाणी प्रश्नाबाबत विचार व्हावा.

**मा.श्री.अभय आगरकर** - निरनिराळया अंदाजपत्रकातील तरतुद कमी करीत असतांना विद्यमान चालू कामावर परिणाम होणार आहे काय तसेच शहरातील सर्व वॉर्डामधील विकास कामांना समान न्याय देणार आहात काय व समतोल विकास होण्यासाठी काय कार्यवाही करणार आहात या बाबतचा खुलासा करण्यांत यावा.

यावर मा.महापौर यांनी खुलासा केला की, सध्याच्या कुठल्याही विकास कामावर यामुळे अडथळा येणार नाही. रस्ते डांबरीकरण, गटार दुरुस्ती, नविन पाईप लाईन इत्यादी हेड फार मोठे कमी केलेले नाहीत. तसेच रस्ते दुरुस्ती पॅचिंग कामावरही यावर परिणाम होणार नाही. असे सांगितले.

**मा.श्री.अभय आगरकर** - उपरोक्त प्रस्तावावरील यादी पाहिलीतर या यादीमध्ये नविन ॲड करणार किंवा कमी केले जाणार काय व नेमकी कोणत्या यादीस मान्यता देण्यांत येणार आहे. व सर्वांना समान न्याय देणार आहात काय.

**मा.श्री.दिपक सुळ उपमहापौर** - जे आवश्यक आहेत ते त्यामध्ये घेण्यांत येतील.

**मा.श्री.अभय आगरकर** - समतोल विकास झाला पाहिजे.

**सभापती, स्थायी समिती मा.श्री.अविनाश घुले,** - सर्व विषय मंजूर करावेत व पुढील विषय घ्यावेत असे सुचविले.

**विषय क्रमांक ४ - घनकचरा व्यवस्थापन**

मा.श्री.दिप चव्हाण - महानगरपालिकेकडे एकुण किती गाडया आहेत ?  महानगरपालिकेकडे एकुण ड्रायव्हर किती आहेत. किती ड्रायव्हरच्या जागा रिक्त आहेत याबाबत खुलासा करावा.

यावर श्री.मेहेत्रे यांनी खुलासा केला असता १९ गाडया आणि २८ ड्रायव्हर आहेत असे सांगितले.

मा.श्री.दिप चव्हाण - ४ रिक्त पदे आवश्यकता असतांना अद्यापी का भरली गेली नाहीत.

मा.महापौर - सदरच्या जागा त्वरीत भरणे बाबत आस्थापना विभागास आदेश दिले.

मा.श्री.आगरकर - ड्रायव्हरची पदे किती दिवसात भरली गेली नाहीत त्यामुळे महानगरपालिकेचा तोटा झाला किंवा काय फायदा झाला या बाबत खुलासा करावा. व माहिती अद्यावत आस्थापना विभागाने का ठेवलेली नाही.

मा.श्री.दिप चव्हाण - ड्रायव्हर घेण्यांत येणार आहेत या महानगरपालिकेच्या गाडयांचा मेंटनन्स कोण करणार आहेत व त्यासाठी कोण घेणार आहेत.

मा.श्री.कृ.द.जाधव - माजी सैनिक संघटनेचा जलतरण तलाव चालविण्याचा अनुभव विचारात घेता त्यांचे कडील ड्रायव्हर कामास लावल्यास गाड्यांना होणा-या अपघाताची जबाबदारी कोणाची राहील. त्याबाबत आपली नियमावली तयार करुन घेण्यांत यावी. याबाबत निविदा मध्ये नमुद केले आहे किंवा कसे ?
मा.श्री.अनंत जोशी - ४० टक्के आवारुचे काम ५ ते ७ टक्के लेबर कॉन्ट्रॅक्ट वर होईल याबाबत निगोसिएशन केले पाहिजे.
मा.महापौर - महानगरपालिकेने कचरा उचलणे व वहातुकीसाठी खाजगीकरण करावयाचे ठरविले असतांना एवढया मोठया प्रमाणात वाहने घेण्याची आवश्यकता नव्हती. याची जबाबदारी आयुक्त यांचेवर आहे. हा विषय प्रशासन यांच्या हट्टामधुन आलेला आहे.
मा.उपमहापौर - खाजगी करणामधुन हे काम शक्य होते. एवढया मोठया प्रमाणावर गाडया घेतल्यास महानगरपालिकेला गाडया लावण्यासही सध्या जागा उपलब्ध नाही.
मा.श्री.आगरकर - अशा प्रकारे माहिती असेल तर सदरचा विषय सिरीयस आहे मात्र यामधुन मार्ग काढला गेला पाहिजे आवश्यकता असल्यास याबाबत समिती नेमण्यांत यावी.
मा.श्री.कृ.द.जाधव - हा विषय गंभीर आहे. वाहनांसाठी दीड ते दोन कोटी रुपये खर्च होणार आहेत. ड्रायव्हर मेंटेनन्स इंधन इत्यादीचा खर्च महानगरपालिकेस करावा लागणार आहे. त्यामुळे असे सुचवावेसे वाटते की, आयुक्त, शहर अभियंता यांना शासनाकडे पाठवुन द्यावे.
मा.महापौर - सभेला आयुक्त उपस्थित नाहीत त्यामुळे हा विषय तुर्त तहकुब ठेवण्यांत येत आहे. व आयुक्त यांच्या उपस्थितीत हा विषय घेण्यांत येईल असे सुचविले.
मा.श्री.कृ.द.जाधव - आयुक्त रजेवर गेल्यास उपायुक्त हांगे यांना चार्ज देणेबाबत शासनास कळवावे.

**विषय क्रमांक - ५ - रस्ते निविदा प्रसिध्द करणे.**

मा.श्री.शकरराव घुले - पत्रकार चौक ते अप्पु चौक ते नेप्ती चौक या पुर्वी सदर रस्त्याचे काम पूर्ण करण्यांत आलेले होते त्याची जबाबदारी कोणावर राहील. हे काम पूर्ण न झाल्यास त्याची कार्यवाही का केली नाही. व त्या ठेकेदारास काळया यादी का घातले गेले नाही याचा खुलासा करावा. सदर रस्त्याचे एस्टीमेंट आता १० कोटींच्या वर गेलेले आहे. या रस्त्याकरीता कर्ज काढण्याची भुमिका घेतली गेली आहे. महानगरपालिकेला बरेच देणे आहे. त्यामुळे कर्ज काढण्यासाठी शासनाची मंजूरी घ्यावी लागणार आहे. रस्ते करतांना कॉक्रीट आवश्यक असल्यास जरुर करावे. पत्रकात वसाहत ते अप्पु चौक ते दिल्लीगेट ते नेप्तीचौक हा रस्ता डांबरी करावा. ठेकेदाराकडुन याबाबतची गॅरंटी घ्यावी १० कोटींच्या वर हे बजेट आहे. नाहक पैसाजास्त खर्च करु नये. लवकरच महानगरपालिकेची जकात बंद होउ शकेल त्यामुळे अडचणी येतील. या रस्त्यावर यापुर्वी ठेकेदारांनी काम केलेले असतांना नुकसान केंलेले आहे. साईडच्या गटारींचे काम झालेले नाही. ठेकेदारांनी काय काम केले यास जबाबदार कोण आहे याचा खुलासा करावा.

यावर अभियंता श्री.मगर यांनी खुलासा केला.

मा.श्री.फुलसौंदर - यापुर्वी रस्त्या बाबत एम.एस.आर.डी.सी कडुन रस्ते करुन घेणे बाबत विचारणा करण्यांत आली होती. त्या मंडळास हे काम देण्यात यावे.
मा.श्री.आगरकर - वस्तुस्थिती अशी आहे की, पाठीमागील ठेकेदार यांनी डांबरीकरणाचे काम सोडुन दिलेले आहे. चांगले काम करणारे ठेकेदार /लोक महानगरपालिकेला नको आहेत. याबाबत महानगरपालिकेने निरपेक्ष बुध्दीने निराकरण केले पाहिजे. रस्त्याच्या कामामध्ये ज्या अपप्रवृत्ती घुसल्या आहेत त्यास पायबंध बसला पाहिजे. ठेकेदार काम का करत नाही तेही गांभीर्यानं पाहिले गेले पाहिजे. यापुर्वीचे ठेकेदार महानगरपालिकेस कंटाळुन निघुन गेले आहेत. नविन लोक कंत्राटदार येत नाहीत.
मा.श्री.कृ.द.जाधव - या रस्त्याचे व चौकाचे टेंडर निघाले आहे काय निविदा प्रसिध्द करणे.

याबाबत शहर अभियंता यांनी खुलासा केला.

मा.श्री.शं.ह.घुले - मागील किती रस्त्यांची कामे केली यास जबाबदार कोण आहेत याचा खुलासा करावा.

यावर शहर अभियंता यांनी खुलासा केला की, कर्ज प्रस्ताव मंजूर झाला नाहीतर यश पॅलेस ते कोठी व पाईप लाईन रस्त्याचे टेंडर काढण्यांत येणार नाही.

मा.श्री.कृ.द.जाधव - महानगरपालिकेच्या वतीने जी जकात वसुल केली जात आहे. ती चांगलया रितीने वसुल होत आहे. याबद्दल मी जकात विभागातील सर्व कर्मचा-यांचे अभिनंदन करतो व तयांची हिंमत त्यांनी दाखवुन दिली आहे याबद्दल मी त्रिवार अभिनंदन करतो. शेवटी रस्त्याचा विषय मंजूर करावा असे सुचवितो.

मा.श्री.आगरकर - सदर प्रस्तावास अनुमोदन देवुन सांगितले की, महानगरपालिकेची लायबलिटी सध्या ९९ लाखाची आहे तथापि एमएसईबी व इतर यांची १४० कोटींची लायबलिटी आहे. कर्जा अभावी पैसे नाही म्हणुन योजना रखडु देवु नका व या बाबत वस्तुस्थितीचा विचार करावा.

मा.महापौर यांनी सांगितले की, याबाबत मे.शासनाच्या फॉरमॅट मध्ये माहिती दिल्यानंतर महानगरपालिकेस कर्ज मिळणार आहे.

मा.श्री.आसाराम कावरे - रस्ते एमएसआरडी कडुन का करुन घेत नाहीत.

**विषय क्र.६ :**

मा.श्री.सुनिल कोतकर - सदरचा प्रस्ताव महासभेपुढे मांडल्याबद्दल मी मा.महापौर श्री. संदिप कोतकर यांचे अभिनंदन प्रस्ताव मांडतो व याबाबत शासनाकडुन पहिला हप्ता दिलेला आहे याबद्दलही अभिनंदन करतो.

मा.श्री.गिरवले - सदरच्या प्रस्तावास माझे पुर्ण अनुमोदन आहे. याबाबत टेंडर मागविलेले आहेत. पाईपचे दर वाढलेले आहेत सदर बाबतीत अबावु दर येतात २५ कोटीच्या योजनेत ५० टक्के जादा आले तर कसे करायचे कंपनी मार्फत डायरेक्ट पाईप मागविण्यांत येवुन खोदाई व इतर खर्च ठेकेदाराकडुन करावा. पुर्वी जिंदाल कंपनी मार्फत जसे पाईप मागविण्यांत आले होते तसे मागवावे.

सध्या केडगांव आणि सारसनगर भागामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे याबाबत नियोजनाचा अभाव आहे तसे नियोजन करावे. पाणीपुरवठा विभाग हा एकाच नियंत्रकाकडे देण्यांत यावा. पाणी पुरवठयाचे वितरण जुन्या पध्दतीने होत आहे. पाणी पुरवठा टँकरला तोटया बसविण्या बाबतही कार्यवाही करुन घेण्यांत यावी. टँकर मार्फत सर्व सामान्य लोकांना पाणी मिळाले पाहिजे व टँकर खेपा वाढविण्यांत याव्यात.

मा.श्री.गारुडकर -  मंजूर करावा असे सुचविले. केडगांव पाणी पुरवठा योजना मंजूर केल्या बद्दल सर्व केडगांव वासीय नागरिकांच्या वतीने अभिनंदन करतो.

मा.श्री.सुनिल कोतकर - महानगरपालिकने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ यांचेकडुन त्यांचे रेट कॉन्ट्रॅक्ट सह खरेदी करण्यांत यावे किंवा महानगरपालिकेने सदरचे पाईप तातडीने मिळणेसाठी स्वतंत्र जाहिर निविदा मागवावी.

# विशेष अनुदान अंतर्गत प्रस्तावित कामांची यादी

| अ.नं. | प्र.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २ | पुष्पक हॉटेल ते वैष्णवी ट्रेडर्स ते तपोवन रोड पर्यंत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | ९,८३,६१६/- |
| २ | ९ | टिळक रोड (जुना, वाडियापार्क समोरिल) रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे. | २५,००,०००/- |
| ३ | २ | राज्य कर्मचारी वसाहत (समतानगर) रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ७,०८,०४२/- |
| ४ | १२ | गुलमोहर चौक ते कुष्ठधाम ते पाईपलाईन रोड वरील भिस्तबाग चौक रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २०,००,०००/- |
| ५ | १५ | भिंगारवाला चौक ते सर्जेपुरा रंगभुवन शॉपींग सेंटर पर्यंत ४० एम एम ॲस्फलटिक कॉक्रीट करणे. | २७,१६,५९६/- |
| ६ | ८ | केडगांव येथील भुषणनगर मधील अंतर्गत आरती हौ., अजिंक्य नगर, राहींज मळा, एकता कॉलनी, गणपती मंदीर परिसर, राणी लक्ष्मीबाई चौक व नम्रता कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ३३,०३,९१४/- |
| ७ | २ | शिवनगर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | २४,००,०००/- |
| ८ | ५ | जिजामाता उद्यान ते ढोर वस्ती ते व्हिडिओकॉन रस्ता डांबरीकरण करणे. | १५,१५,०००/- |
| ९ | ५ | सारसनगर पूल ते कानडेमळा दरम्यान रस्त्याचे रुंदीकरण करुन डांबरीकरण करणे. | ९,९५,२०५/- |
| १० | ९ | जैन स्थानक जवळ रेल्वे स्टेशन कंपौंड पासुन अनंत सोसायटी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १२,०१,००० /- |
| ११ | १५ | राज चेंबर ते मंगलगेट पोलिस चौकी ते गंज बाजार कोप-यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,००,७०० /- |
| १२ | ८ | केडगांव एकनाथनगर राधाकृष्ण कॉलनी येथे जगदाळे घर ते राधाकृष्ण मंदीर, डयुरा फॅब ते वाळके ते शेख ते नाल्यापर्यंत जलनिसारण व्यवस्थेसह अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १४,१७,६६३/- |
| १३ | ३ | साई फर्निचर ते बजाज कॉलनी , शेख हाजी गफार घर ते सुल्तान किराणा, शालिमार सप्लायर्स समोरील कॉलनी, शेख अन्वर घर तसेच महाराष्ट्र किराणा ते आयेशा मस्जिद, नशेमन कॉलनी, जिशान कॉलनी, तरन्नुम कॉलनी, सिमला रो.हौसिंग सोसायटी ते तांबोळी घरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ३०,०१,३४० /- |
| १४ | १२ | नोबेल हॉस्पीटल अंतर्गत रस्ते मजबुतीकरण डांबरीकरण करणे | ५,९८,०६५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | ११ | धर्माधिकारी मळा अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे | ९,९०,०००/- |
| १६ | १ | टिपरे घर ते विशाल हनुमान मंदीर ते दुतारे वस्ती रस्ता डांबरीकरण करणे. | ९,९१,२६३/- |
| १७ | १ | राघवेंद्र स्वामी रोड ते रमजान भाई शेख यांचे वर्कशॉप ते गोपीनाथ आढाव घर ते खरात घर ते भोडे घर ते बालाजी नगर रस्ता डांबरीकरण करणे | ९,९८,३००/- |
| १८ | ८ | केडगाव आयोध्यानगर येथील सोनटक्के घर ते कोतकर ते लांडे ते बडे ते ओम मेन्स पार्लर ते घुले सॉमिल व शेळके घर ते महाले घर पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे | ६,९७,३००/- |
| १९ | १ | नगर मनमाड रोड ते चव्हाण हॉस्पीटल ते गणपती मंदीर म्हस्के घर ते भांडे घर रस्ता डांबरीकरण करणे. | ९,७२,३७१/- |
| २० | ३ | गौरवनगर भागात कांबळे घर ते डिडवाणी घर तसेच आवारे घर ते विजय लॉड्री पर्यंत तसेच आफाक घर ते आंतेपल्लू घरापर्यंत डांबरीकरण करणे. | ७,००,६३७/- |
| २१ | ३ | फकिरवाडा (औरंगाबाद रोड) पंचवटी हॉटेल ते एस.एस.खान घरापर्यंत डांबरीकरण करणे | ५,००,४२४/- |
| २२ | १ | नगर मनमाड हायवे ते अमित सर्व्हीस स्टेशन मागील भाग ते घुले हॉस्पीटल ते गुरुदत्त कॉलनी ते आकांशा ब्युटीपार्लर ते मंचे कॉलनी ते अक्षय कॉलनी ते बोरकर घर रस्ते डांबरीकरण करणे | ९,१९,४७९/- |
| २३ | ८ | केडगांव लिंक रोड दिप नगर अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ८,२५,६१७/- |
| २४ | ५ | पराग बिल्डींग ते चांदणी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | ५,००,२००/- |
| २५ | १६ | कासमशहा दर्गा ते शाळा क्र.४ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे तसेच पैमाना हॉटेल ते बकर कसाब जमातखाना रस्ता डांबरीकरण करणे | ७,०३,५०५/- |
| २६ | ११ | मनमाड रोड ते नाना नानी पार्क ते बालीकाश्रम रोड रस्ता डांबरीकरण करणे | ६,७२,०००/- |
| २७ | १ | पंचवटीनगर अंतर्गत भागात डांबरीकरण करणे | १२,००,१७९/- |
| २८ | ७ | केडगांव बालाजी कॉलनी येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे व बालाजी संपवेल येथील कॅक्रीटीकरण करणे. | ६,९२,०५९/- |
| २९ | १ | साईबन कॉलनी, आशियना कॉलनी, आयोध्या, अक्षता अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | १२,००,५८५/- |
| ३० | १७ | माळीवाडा वेस ते वाडियापार्क ते मुकुंद मंगल कार्यालय पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | १२,५६,३९७/- |
| ३१ | १ | स्मशानभूमी रोड ते बारस्कर कॉलनीरस्ता डांबरीकरण करणे | ६,३५,०००/- |
| ३२ | ७ व ८ | केडगांव मधील नगर-पुणे रोड , केडगांव हनुमानमंदिर ते | ४४,१५,१६२/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | देवी मंदिरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे व सी.डी.वर्क बांधणे. | |
| ३३ | ६ | आनंदधाम, छत्रपती भाजी मार्केट ह्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणे. | २४,००,०००/- |
| ३४ | १ | १. अकोलकर ओपीडी ते शिवा चव्हाण घर ते पोखर्णा घरापर्यंत २. वडगांवगुप्ता रोड ते वक्ते कॉर्नर पर्यंत ४० एम.एम.डब्यु.बी एम व डांबरीकरण करणे | १२,००,७७६/- |
| ३५ | १ | डॉन बास्को रोड अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे. | ४,००,६२४/- |
| ३६ | ११ | मनमाड रोड ते शाहूनगर ते रिंग रोड रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे | ६,९९,९९९/- |
| ३७ | १ | आरोह कॉलनी, सब्बन कॉलनी व वाघमळा रस्ता डांबरीकरण करणे | ११,०४,१३४/- |
| ३८ | ७ | केडगांव ओंकार नगर येथे अंतर्गत रस्त्याचे जलनि:स्सारण व्यवस्थेसह डांबरीकरण करणे. | २८,२४,३५१/- |
| ३९ | २१ | माणिक चौक ते संगम चौक ते बुरुडगल्ली मारुती मंदीर, चांद सुलताना हाईस्कुल ते बॉम्बे बेकरी व माणिक चौक ते मदवशाह पिर व तुलसीविहार बाळासाहेब देशपांडे दवाखाना पर्यंत व वर्धमान चेंबर ते अर्बन बँक व नया घर ते बॉम्बे मिठाई वाला पर्यंत डांबरीकरण करणे. | ११,१८,०४५/- |
| ४० | १ | नागापुर साईश्रध्दा कॉलनी, गुरुकृपा कॉलनी, ओंकार कॉलनी, अंकुर कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | ९,८०,६८५/- |
| ४१ | १ | संत तुकाराम नगर ते रेणुका सप्लायर्स ते पुंड इस्त्री दुकान ते सोनवणे घर रस्ता डांबरीकरण करणे | ९,५०,५६६/- |
| ४२ | ३ | अलमास पार्क ते जिल्हा परिषद शाळा ते इकरा स्कुल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | ७,२८,०००/- |
| ४३ | ७ | केडगांव येथील शिक्षक कॉलनी व मोतीनगर येथे जलनि:स्सारण व्यवस्थेसह रस्ता डांबरीकरण करणे. | १३,२७,५२३/- |
| ४४ | ३ | न्यु हिंद पार्क शहबाज किराणा स्टोअर ते अलहिंद किराणा स्टोअर ते इकबाल पत्रकार ते मरियम मस्जीद पर्यंत रस्ते डांबरीकरण करणे. | ६,४२,०००/- |
| ४५ | ४ | कृष्णा कॉम्पलेक्स आर टी ओ रोड ते माहेश्वरी कॉलनी अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | ५,१०,०००/- |
| ४६ | १ | भारत बेकरी ते सय्यद घर भिंगारदिवे घर ते संपत किराण दुकाण रस्ता डांबरीकरण करणे | ८,९८,३००/- |
| ४७ | २ | सुर्य नगर अंतर्गत रस्त्यांचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे | २०,००,४१०/- |
| ४८ | २ | श्रीराम चौक ते वसंत टेकडी पाण्याची टाकी ते संदेश नगर रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | ५,०७,३९८/- |
| ४९ | ८ | केडगांव रभाजी नगर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण | २४,५०,१२४/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करणे. | |
| ५० | ४ | कोठला धार्मिक परिसर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | ६,००,८००/- |
| ५१ | ३ | मरियम मस्जीद जवळील रस्ते डांबरीकरण करणे | ५,१७,०००/- |
| ५२ | १२ | डिझाईनर कॉलनी अे व बी अंतर्गत डांबरीकरण करणे | ५,७४,०००/- |
| ५३ | ७ | वार्ड क्र. मध्ये केडगाव सहयाद्री नगर व सुंशातनगर भागात रस्ता डांबरीकरण करणे | १२,११,०००/- |
| ५४ | ७ | केडगांव मधील अरणगांव रोड मयुरी नगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,६०,२१६/- |
| ५५ | ३ | इक्रास्कूल मेनरोड ते मरियम मस्जिद ते मुन्नी आप्पा घरापर्यंत असलेली तीन रस्ते डांबरीकरण करणे . | १०,००,६००/- |
| ५६ | ३ | ए.डी.सी.सी. बॅंक ते संभाजी टी सेंटर पर्यंत रस्ते डांबरीकरण करणे | ५,५०,०००/- |
| ५७ | ५ | सारसनगर महात्मा फुले नगर अंतर्गत रस्ता डांबरीकरण करणे. | ७,३१,५३०/- |